# EDUCATION LANDSCAPE STUDY: KHED TALUKA

खेड तालुक्यातील शैक्षणिक बाबींचे अवलोकन

डिसेंबर २०१९ | पुणे

FORBES MARSHALL

LEADERSHIP FOR EQUITY

## फ़्फ़ोर्ब्स मार्शल लि. आणि एफ़्फ़एम फ़्फ़ाउंडेशन

फ़्फ़ोर्ब्स मार्शल (एफ़्फ़एम) ही अभियांत्रिकी आणि ऊर्जा संवर्धन क्षेत्रातील एक अग्रगण्य भारतीय कंपनी आहे, विशेषत: प्रक्रिया उद्योग, स्टीम अभियांत्रिकी आणि नियंत्रण साधने उत्पादने बनवणे यामध्ये. तंत्रज्ञान टाय-अप (भागीदारी) आणि उत्पादन व संशोधनात केंद्रित गुंतवणूकीद्वारे कंपनी प्रक्रिया कार्यक्षमता आणि ऊर्जा संवर्धनात अग्रणी म्हणून विकसित तथा नावारूपास आलेली आहे. फ़्फ़ोर्ब्स मार्शलच्या व्यवसाय पद्धती आणि प्रक्रियांनी नाविन्यपूर्ण उपाय तथा निराकरण प्रदान करणारे विश्वासू भागीदार जोडण्याचे / एकत्र आणण्याचे तत्व अंगीकारले आहे. कंपनीचा सामाजिक उत्तरदायित्व विभाग आरोग्य, शिक्षण आणि सबलीकरणावर लक्ष केंद्रित करून काम करतो; आणि मग ज्या संस्थांमध्ये याबाबतचे कौशल्य, क्षमता आणि तत्सम मूल्ये आहेत त्यांसोबत भागीदारी करतो. या भागीदारींमुळे फ़्फ़ोर्ब्स मार्शला व्याप्ती आणि परिणाम एकत्र साध्य करण्यात मदत झालेली आहे. या अनुभवांच्या आधारे, महाराष्ट्र राज्यातील प्रकल्प आणि पुढाकारांना सहाय्य करण्यासाठी, त्यांचा सध्याचा प्रभाव वाढविण्याच्या उद्देशाने फ़्फ़ोर्ब्स मार्शल फ़्फ़ाउंडेशनची नुकतीच स्थापना झालेली आहे. फ़्फ़ाउंडेशनच्या माध्यमातून, फ़्फ़ोर्ब्स मार्शल जे उपक्रम तथा प्रकल्प व्याप्ती सोबतच संरचनात्मक सामाजिक बदल घडवत आहेत अशा शाश्वत आणि आणि सहयोगी उपक्रमांना तथा प्रकल्पांना सहाय्य करण्यास वचनबद्ध आहे, जे विशेषत: असे उपक्रम जे सेवा-अंतर्गत आणि अल्प-अनुदानीत गरजा पूर्ण करतात. जरी फ़्फ़ोर्ब्स मार्शल फ़्फ़ाऊंडेशनच्या कार्यक्रमांची व्याप्ती आणि कार्यक्षेत्र कालांतराने बदलेले आहे, तरी आपण समाजात चांगले बदल घडवून आणू शकतो यावर विश्वास मात्र कायम आहे.

## लीडरशिप फ़्फ़ॉर इक्विटी (एलएफ़्फ़ई)

लीडरशिप फ़्फ़ॉर इक्विटी (एलएफ़्फ़ई) ही एक सामाजिक संस्था (एनजीओ) - प्रणाली (सिस्टम) बदल आणि संशोधन करणारी संस्था असून जी व्यापक प्रमाणात शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी संरचनात्मक आणि सुधारणा अंमलबजावणी मध्ये शासनास मदत करते. एलएफ़्फ़ईचा मूलभूत विश्वास असा आहे की सार्वजनिक शिक्षण व्यवस्था ही समता प्रदान करण्यातील एक प्रमुख प्रणाली असून प्रभावी आणि संवेदनशीलपणे प्रत्येक बालकास दर्जेदार शिक्षण प्रदान करण्याबाबत सुनिश्चिती करेल. एलएफ़्फ़ई प्रामुख्याने अधिकारी व्यावसायिक विकास (ऑफ़्फ़िसर प्रोफ़्फ़ेशनल डेव्हलपमेंट), शिक्षक व्यावसायिक विकास (टीचर प्रोफ़्फ़ेशनल डेव्हलपमेंट), तंत्रज्ञान सक्षम शिक्षण (टेक्नॉलॉजी एनेबल्ड लर्निंग) आणि समर्थन आणि सल्लागार (ॲडव्हायझरी ॲंड ॲडव्होसी) अशा चार प्रमुख कार्यक्षेत्रांमध्ये कार्य करते. एलएफ़्फ़ई संस्था राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (SCERT) महाराष्ट्र राज्य, प्रादेशिक विद्या प्राधिकरण (RAA) औरंगाबाद, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक उत्पादन व अभ्यासक्रम संशोधन (बालभारती), जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था (DIET), पुणे महानगरपालिका (पीएमसी), नाशिक जिल्हा परिषद आणि पिंपरी चिंचवड म हानगरपालिका (पीसीएमसी) यांसोबत सध्या काम करत आहे.

## योगदान कर्त्यांची यादी

लेखक
अनिरुद्ध अग्रवाल
रितिका सबॅस्टिअन

प्रमुख योगदान कर्ते
कॅटलिन लुझाडो
प्रांजली हर्डिकर
राहुल सुवर्णा
सिद्धेश सर्मा
मधुकर बानुरी
झफिया जेना

प्रत्यक्ष अन्वेषक / शोधकर्ते
आकाश बुर्लावार
मयूर शिंदे
सिद्धार्थ वादनकर
वृषाली खुंटे
आरती यादव

For more information please contact: bjoshi@forbesmarshall.com; info@leadershipforequity.org

# ऋणनिर्देश

“Education Landscape Study – Khed Taluka” हा संशोधनात्मक अभ्यास आमचे टीम सदस्य, सहयोगी आणि या विषयाशी संबंधित तज्ज्ञांकडून मिळालेल्या सहाय्याखेरीज शक्य झाला नसता. हा अभ्यास पूर्णत्त्वाला नेण्यासाठी ज्यांची ज्यांची मदत झाली त्या सर्वांचे आम्ही आभार मानू इच्छितो.

सर्वप्रथम  आम्ही पुणे जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी श्री सुनील कुऱ्हाडे आणि गटशिक्षणाधिकारी श्री नाईकडे यांचे आभार मानू इच्छितो, कारण त्यांनी या संशोधन अभ्यासासाठी आम्हाला सर्वतोपरी सहाय्य पुरवले. याशिवाय, आम्ही खेड तालुक्याचे गट विकास अधिकारी, श्री. कळमकर यांचेही आभारी आहोत, कारण आम्हाला जेव्हा जेव्हा कोणत्याही गोष्टीची गरज भासली तेव्हा ती माहिती उपलब्ध करून देण्यासाठी आणि संशोधन अभ्यासाचे काम सुरळीत चालू राहण्यासाठी त्यांनी मोलाचे सहाय्य केले. सोबतच, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी सुध्दा आश्रमशाळांमध्ये संशोधन करण्यास परवानगी दिल्याबद्दल तसेच अभ्यासादरम्यान सहकार्य केल्याबद्दल विभागातील सहसंचालक श्रीमती नंदिनी आवडे आणि विभागातील इतर अधिकारी वर्ग यांचे आभार. फोर्बज मार्शल कंपनीच्या सामाजिक उपक्रम विभागाच्या टीमचे – रती फोर्बज, बीना जोशी आणि स्वप्निल हुंबारे यांचेही आम्ही आभार मानू इच्छितो. त्यांनी दिलेल्या मार्गदर्शनामुळे आणि सहकार्यामुळे हा अहवाल अधिकाधिक गुणवत्तापूर्ण होण्यास मदत झाली.

ज्या सहभागी व्यक्तींच्या आणि प्रमुख व्यक्तींच्या मुलाखतींनी दिलेल्या माहितीमुळे या अहवालातील महत्त्वाचे निष्कर्ष नोंदवता आले, त्या सर्वांचेही आम्ही आभारी आहोत. आमच्या सर्व प्रश्नांना त्यांनी शांतपणे उत्तरे दिली आणि त्यासाठी त्यांचा अमूल्य वेळही दिला. विशेषत: आंबोली (खेड) येथील एका खाजगी अनुदानित शाळेचे मुख्याध्यापक  श्री. पोटावदे यांचे आम्ही विशेष आभारी आहोत, कारण त्यांनी आम्हाला खेड तालुक्यातील वस्तुस्थिती प्रत्यक्ष जाणून घेण्यासाठी  मदत केली आणि पायलट स्टडी (पथदर्शी अभ्यास) साठी त्यांच्या शाळेचा वापर करू दिला. त्यांचे मार्गर्शन, सहाय्य आणि त्यांनी दिलेली माहिती हे सारेच या अभ्यासासाठी अत्यंत महत्त्वाचे होते.

लीडरशिप फॉर इक्विटी संस्थेतील अंतर्गत टीमचेही आम्ही आभारी आहोत, कारण या टीममधील सदस्यांनी आम्हाला हा संशोधन अभ्यास पूर्णत्वाला नेण्यासाठी सतत मदत केली. आम्ही श्री. राहुल सुवर्णा यांचे विशेष आभारी आहोत .त्यांनी पुणे जिल्ह्यातील व खेड तालुक्यातील सरकारी विभागांशी संपर्क-समन्वय साधण्यासाठी, निरनिराळ्या परवानग्या मिळवणे तसेच माहिती गोळा करणे या कामी आम्हाला त्यांची खूपच मोलाची मदत झाली. याशिवाय आम्ही श्री. सिद्धेश सर्मा यांचेही आभारी आहोत, ज्यांनी या अहवालाची गुणवत्ता उत्तम होण्याच्या दृष्टीने अचूक माहिती पुरवली. श्री. सिद्धेश यांबरोबरच श्री. मधुकर बानुरी यांनीही या संपूर्ण प्रकल्पादरम्यान आमच्या टीमला सातत्याने मार्गदर्शन केले. श्री. आकाश बुर्लावार आणि कुमारी प्रांजली हर्डीकर यांनीही माहिती गोळा करण्यासाठी त्यांचा अमूल्य वेळ दिला आणि मदत केली. टीमला त्यांच्या इच्छित ध्येयापर्यंत पोचण्यासाठी त्यांनी सतत प्रेरणा दिली.

शेवटी ज्यांचा उल्लेख केल्याशिवाय हे काम पूर्ण होऊ शकणार नाही, ते म्हणजे आमच्याकडील इंटर्नस (प्रशिक्षणार्थी) ज्यांनी संपूर्ण प्रकल्पाच्या कालावधीत आमच्याबरोबर काम केले - झाफ्या जेना, मयूर शिंदे, सिद्धार्थ वादनकर, वृषाली खुंटे, आरती यादव आणि कैटलिन लूझाडो. या सर्वांनी केलेल्या कष्टांमुळेच हा अहवाल पूर्ण करणे शक्य झाले. विद्यार्थ्यांना सरकारी व खाजगी शाळांमधील शिक्षणापर्यंत पोचण्याची संधी जास्त प्रमाणात उपलब्ध व्हावी, तसेच तेथील शिक्षणाचा दर्जा सुधारावा यासाठी दीर्घकालीन उपायपद्धतींची रचना करण्यासाठी  या अभ्यासाची मदत होईल अशी आम्हाला आशा आहे.  आम्हाला हा अभ्यास करण्याची संधी दिली गेली याबद्दल आम्ही कृतज्ञ आहोत.  आम्हाला अशी आशा वाटते की, खेडमधील सध्याच्या आणि भविष्यातील शिक्षणप्रणालींशी संबंधित आणि सर्वांना अधिक चांगले शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने ज्या महत्त्वाच्या व्यक्ती/संस्था आहेत त्या सर्वांसाठी हा अभ्यास उपयोगी ठरेल.

# अनुक्रमणिका


ऋणनिर्देश ३

प्रस्तावना ५

खेड तालुका: काही महत्त्वाचे निष्कर्ष ८

शिफारशी ३०

संदर्भ: ३६

परिशिष्ट ३८

# प्रस्तावना

# संशोधनाची पार्श्वभूमी

महाराष्ट्र राज्यामधील पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यामध्ये अनेक कंपन्यांनी गेल्या काही वर्षांत शैक्षणिक क्षेत्रात कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (CSR) अंतर्गत अनेक उपक्रम राबवलेले आहेत. याचे मुख्य कारण म्हणजे महाराष्ट्र इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (MIDC) चे क्षेत्र येथे मोठ्या प्रमाणात पसरलेले आहे. सध्याच्या काळात अशा उपक्रमांसाठी जबाबदार असणाऱ्या कंपन्यांच्या धोरणांमुळे आणि कायद्यातील आवश्यकतांमुळे सीएसआर (CSR) उपक्रमांची रचना ही मुख्यत: गरजनेनुसार किंवा त्या त्या कंपनीच्या धोरणानुसार/ प्राधान्यक्रमानुसार असते, हे सर्वांनाच माहीत आहे. याबाबतीत एक अडचण नेहमीच जाणवते ती म्हणजे सामाजिक समस्यांच्या प्रामुख्याने गंभीर तथा दीर्घ स्वरूप असलेल्या समस्यांच्या बाबतीत या धोरणांमधून जे उपक्रम तयार केले जातात ते एकमेकांशी संबंधित नसतात आणि त्यांची व्याप्ती काही विशिष्ट समस्यांपुरतीच किंवा काही विशिष्ट भौगोलिक प्रदेशांपुरतीच असते. निरनिराळ्या अहवालांमध्ये हे पुन्हा पुन्हा सांगण्यात आलेले आहे की शिक्षणक्षेत्रातील समस्यांसाठी दीर्घकालीन उद्दिष्ट ठेवून कार्य करणे आवश्यक आहे. एलएफई (LFE) संस्थेस असे वाटते, की विशेषत: खेड तालुक्यात निरनिराळे प्रकल्प अशा रीतीने एकमेकांपासून संबंधित नसण्याचे एक कारण म्हणजे या भागातील शैक्षणिक घटकांबद्दलचे एक सविस्तर विश्लेषण उपलब्ध नसणे, ज्यामुळे शिक्षण सर्वांनाच समान पद्धतीने उपलब्ध नसण्याची आणि शिक्षणाची एकूण गुणवत्ता कमी असण्याची समस्या निर्माण झालेली आहे. त्यामुळेच, शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी आणि शिक्षणाच्या सुविधा सर्वांना समान उपलब्ध होण्यासाठीच्या दीर्घकाळापर्यंत उपक्रमांना सहाय्य करण्यासाठी सातत्याने व दीर्घकाळपर्यंत पद्धतशीरपणे गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने, खेड तालुक्यातील शिक्षणविषयक समस्या व आव्हाने अधिक चांगल्या रीतीने समजून घेण्यासाठी या अभ्यासाची मदत व्हावी, हेच या अभ्यासाचे उद्दिष्ट आहे.

या संक्षिप्त अहवालात सुरूवातीला खेड तालुक्याबद्दलची माहिती दिलेली आहे. त्यानंतर शिक्षणाची उपलब्धता आणि मूलभूत सुविधा यांबद्दलच्या अभ्यासातून दिसून आलेल्या काही महत्त्वपूर्ण निष्कर्षांबद्दल चर्चा केलेली आहे. तसेच विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि समाज तथा सामाजिक संस्था यांच्या सहभागाबद्दलही चर्चा केलेली आहे. ही माहिती व यातील निष्कर्ष एका दीर्घ व सखोल संशोधन अहवालावर आधारीत आहेत. या अभ्यासादरम्यान आम्हास ज्या समस्या सर्वात जास्त प्रमाणात जाणवल्या आणि ज्यांच्या बाबतीत ताबडतोब कार्यवाही करणे आवश्यक आहे असे आम्हास वाटते त्या समस्यांबद्दल येथे प्रामुख्याने माहिती दिलेली आहे.

# संशोधनाची पद्धत

सरकारी व सामाजिक संस्थांना खेडमधील शैक्षणिक क्षेत्रात उपक्रम राबवत असताना त्यांचे निर्णय माहितीवर व ठोस पुराव्यांवर आधारीत घेता यावेत हे या अभ्यासाचे उद्दिष्ट आहे. अशा प्रकारे उपक्रम राबवल्यास तालुक्यातील सर्व मुलांना एकसारखे, समान आणि उत्तम दर्जाचे शिक्षण पुरवणे शक्य होईल. त्यामुळेच, या अभ्यासात खेड मधील शिक्षणविषयक एकूण परिस्थितीचे वर्णन करणे, तसेच या क्षेत्राशी संबंधित असलेल्या महत्त्वाच्या व्यक्ती व संस्थांच्या दृष्टीकोनातून गरजा समजून घेणे - उदा. सरकार, समाज तथा सामाजिक संस्था आणि या तालुक्यातील शिक्षणाची उपलब्धता आणि दर्जा यांवर नियंत्रण ठेवणाऱ्या पद्धतींचे मूल्यमापन करणे हे या अभ्यासाचे उद्दिष्ट आहे. या अभ्यासात सध्या उपलब्ध असलेल्या माहितीचा (डेटाबेसेसचा) उदा. यूडीआयएसई (UDISE) आणि प्राथमिक संकलित माहितीचा उपयोग करण्यात आलेला आहे व खेडमधील वेगवेगळ्या संबंधित व्यक्ती/संस्था यांच्याशी संपर्क साधून त्यांचा दृष्टीकोन समजून घेतलेला आहे. प्राथमिक माहितीत या तालुक्यातील शहरी, ग्रामीण व आदिवासी[१] भागातील ५२[२] शाळांच्या सर्वेक्षणाचा समावेश आहे. या सर्वेक्षणात पालक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी विविध मुद्यांच्या बाबतीत त्यांची मते नोंदवलेली आहेत. यांमध्ये शिक्षणाच्या खर्चापासून शाळेत येण्याजाण्याचा खर्च आणि शिक्षकांचा (शिकवण्याचा) दर्जा यांबद्दचे अनेक मुद्दे आलेले आहेत.[३] या सर्वेक्षणाव्यातीरिक्त पालक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांसोबत गटचर्चा तसेच शिक्षक, समाजातील व्यक्ती, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य आणि सरकारी अधिकारी यांच्या मुलाखतीद्वारे माहिती गोळा करण्यात आलेली आहे. सदर संशोधन करताना सदस्यांनी शहरी, ग्रामीण आणि आदिवासी भागातील प्रत्येक संदर्भात बारकाईने परीक्षण करून निरीक्षण नोंदवण्यात वेळ दिलेला आहे[४].

१. सर्वेक्षणासाठीच्या ठिकाणांची निवड खेडमधील U DIES शाळांच्या यादीतून यादृच्छेने (randomly) /कोणत्याही नियमाशिवाय निवडण्यात आली होती. डेटाबेसनुसार शाळेच्या ठिकाणांचे वर्गीकरण शहरी व ग्रामीण असे करण्यात आलेले आहे - हेच वर्गीकरण शहरी व ग्रामीण भागांसाठी लावण्यात आले होते. शिवाय खालील दोन संवर्गांसा-ठी - अनुसूचित जमातींची लोकसंख्या ७५% आणि अनूसूचित जमातीतील लोकसंख्या. ६०-७५%आमच्या अभ्यासासाठी ग्रामीण भागांचे आदिवासी भाग असेही वर्गीकरण करण्यात आले होते. शाळांची निवड दोन्ही संवर्गांतून समान प्रमाणात करण्यात आली होती.


२. तालुक्यातील एकुण शाळांपैकी (५४९) समारे ९.५%

# खेड तालुका:
# काही महत्त्वाचे निष्कर्ष

२०११ च्या जनगणनेनुसार पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्याची लोकसंख्या ४.५ लाख आहे. खेड तालुक्यातील बराच मोठा भाग ग्रामीण असला तरी येथे चाकणमध्ये व चाकणच्या आसपात एमआयडीसीचे क्षेत्र असून, येथील ८,५०० एकर जागेमध्ये ६०० पेक्षाही जास्त औद्योगिक प्लॉटस आहेत. चाकणपासून जवळच असलेल्या पुणे शहराचा प्रभावही या तालुक्याच्या आग्नेय भागात दिसून येतो. येथील औद्योगिक वसाहतींच्या भागात व राष्ट्रीय महामार्ग ६० च्या जवळपासच्या, तालुक्याच्या आग्नेय भागात विकास जास्त प्रमाणात झालेला दिसून येतो. येथे आर्थिक उलाढाल मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे महाराष्ट्र राज्याच्या कानाकोपऱ्यातून तसेच देशातील सर्व राज्यांमधून येथे लोक स्थलांतरीत होत आहेत. अशा स्थानांतरीत कुटुंबांमधील स्त्रिया सामान्यपणे इतर कुटुंबांमध्ये घरकाम (मोलकरीण) करीत आहेत तर पुरूष एमआयडीसी क्षेत्रात कामे करीत आहेत. या कामांमध्ये मुख्यत: सुरक्षारक्षक, ड्रायवर, फ्लोअर मॅनेजर, फॅक्टरीतील कामगार, स्वच्छता कामगार अशा प्रकारची कामे आहेत. ज्यांच्याकडे थोडेफार कौशल्य आहे ते जवळच्या औद्योगिक क्षेत्रात अधिक चांगल्या, व्यवस्थापकीय पदांवर कामे करीत आहेत.

परंतु याच तालुक्यातील वायव्येकडील भागात तुलनेने कमी विकास झालेला दिसून येतो आणि एमआयडीसी परिसराच्या तुलनेत येथे आदिवासी लोकांचे प्रमाण जास्त दिसून येते. हे लोक मुख्यत: कातकरी आणि ठाकर समाजातील आहेत. या समाजातील लोकांची उपजीविका शेतमजूर म्हणून काम करून, तसेच शेळ्या/मेंढ्या पालन करून आणि इतर अकुशल व मजुरीच्या कामांवर चालते. याखेरीज, हे लोक उपजीविकेसाठी मासेमारीवर आणि शिकारीवरही अवलंबून आहेत. या ब्लॉकमधील वस्त्या आणि शाळादेखील दुर्गम ठिकाणी आहेत, तिथे पोचणेही कठीण आहे आणि त्याचं मुख्य कारण म्हणजे तेथपर्यंत पोचण्यासाठी वाहतुकीची व्यवस्थादेखील फारशी चांगली नाही.

या सर्व गोष्टींमुळे एमआयडीसी परिसरातील विद्यार्थ्यांच्या बाबतीत, तसेच आदिवासी भागातील व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या बाबतीत काही विशिष्ट समस्या निर्माण झालेल्या लिंग व जात यांबद्दलच्या सामाजिक निर्बंधांमुळे या समस्या अधिकच जटील बनलेल्या आहेत. उदाहरणार्थ, एमआयडीसी परिसरातील विद्यार्थ्यांच्या बाबतीत दिसून येणारी एक प्रमुख समस्या म्हणजे त्यांना ज्या माध्यमातून शिक्षण शिकवले जाते ती भाषाच नीट कळत नाही, कारण हे विद्यार्थी स्थलांतरीत कुटुंबातील असतात आणि त्यांची मातृभाषा ही शिक्षणाच्या माध्यम-भाषेपेक्षा वेगळी असते. शिवाय, तालुक्यातील काही भागात मूलभूत सेवासुविधा अगदी प्रकर्षाने लक्षात याव्यात इतक्या जास्त आहेत तर उरलेल्या भागात अशा सुविधा इतक्या कमी आहेत की विद्यार्थ्यांना त्यांचे शिक्षण पूर्ण करता येण्याच्या संधींपर्यंत पोचताच येत नाही. या तालुक्यातील आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी खूपच कठीण परिस्थितींचा सामना करावा लागतो. उदा. त्यांना शाळेत जाण्यासाठी खूप अंतर चालावे लागते, शाळेत जो अभ्यासक्रम शिकवला जातो त्याच्याशी जुळवून घेणे त्यांना कठीण जाते आणि घरची आर्थिक परिस्थिती साधारण असल्यामुळे आणि घरून शिक्षणासाठी सहाय्य नसल्यामुळे जेव्हा ही मुले प्राथमिक शिक्षणातून माध्यमिक आणि त्यानंतरच्या शिक्षणाकडे जात असतात तेव्हा त्यांना हा प्रवास फारच कठीण जात असतो. यानंतरच्या विभागांमध्ये याबद्दल सविस्तर चर्चा केलेली आहे.




आकृती १: खेड तालुका नकाशा

# खेड तालुक्यातील शिक्षणविषयक धोरण आणि त्यावरील नियंत्रण

खेड तालुक्यात सरकारी शाळांमधून दिल्या जाणाऱ्या शिक्षणपद्धतींवर ग्रामीण भागांसाठी पंचायत समिती, खेड तालुका यांचे, तर शहरी भागांसाठी तेथील संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांचे नियंत्रण आहे. या दोन्ही भौगिलोक विभागांमध्ये त्या विभागाचे संबंधित शिक्षणाधिकारी प्रमुख आहेत आणि हे सर्व पुणे जिल्हाधिकारी यांच्या अधिनस्त येतात. खेड पंचायत समितीतील सर्व शाळांवर पुणे जिल्हा शिक्षणाधिकारी यांचे सनियंत्रण आहे.


खेड मधील ब्लॉक एज्युकेशन ऑफिसर (BEO) म्हणजेच गटशिक्षणाधिकारी यांच्या अधिकारात २ एक्स्टेंशन ऑफिसर्स (विस्तार अधिकारी), ३६ केंद्र प्रमुख (KP), तसेच विषय तज्ज्ञ आणि विशेष शिक्षणतज्ज्ञ[५] यांचा समावेश असतो. त्यामुळेच संपूर्ण ब्लॉकसाठी बीईओ (BEO) हे निर्णय घेणारे महत्त्वाचे अधिकारी असतात तर प्रत्यक्ष कार्यपालनाचे वेळी, केपी (KP) - केंद्रप्रमुखांचा शिक्षकांवर दैनंदिन कामाच्या बाबतीत खूपच जास्त प्रभाव असतो. शिक्षकांचे प्रशिक्षण वेळेवर होते आहे ना, प्रशिक्षणानंतर शिक्षकांना सहाय्य करणे आणि राज्य सरकारच्या आणि केंद्र सरकारच्या विविध योजनांच्या बाबतीतील माहिती गोळा करून पुरवणे आणि त्या योजनांची कार्यवाही करणे ही या सर्व अधिकाऱ्यांची तसेच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांची जबाबदारी असते. शिक्षकांनी अधिक चांगल्या पद्धतीने शिक्षण द्यावे यासाठी त्यांना सहाय्य करणे हा त्यांच्या जबाबदारीतील प्रमुख भाग असला तरी त्यांच्या प्रत्यक्ष कामातील मोठा भाग कार्यक्रमाची कार्यवाही करणे, माहिती गोळा करणे आणि माहिती सादर करणे (डेटा रिपोर्टिंग) हा असतो.

केंद्र सरकारतर्फे आणि राज्य सरकारतर्फे विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी अनेक योजना आहेत. परंतु, सदर अभ्यासावेळी असे दिसून आले की, फक्त काहीच थोड्या, लोकप्रिय योजनांबद्दल लोकांना माहिती आहेत. उदा. शिष्यवृत्ती, मोफत गणवेश आणि वह्यापुस्तके, एसटी बस पास, सायकली आणि दुपारचे भोजन (मिड डे मील स्कीम - MDM). याउलट डायरेक्ट बेनिफिट ट्रान्स्फर (DBT) आणि खाजगी शाळांमध्ये २५ टक्के आरक्षण[६] यांसारख्या योजनांबद्दल पालकांना आधी नमूद केलेल्या योजनांच्या तुलनेत खूपच कमी माहिती होती. शिवाय, लाभार्थ्यांकडे पुरेसे कागदपत्र नसल्यामुळे[७] आणि लाभ मिळवण्याच्या प्रक्रियेतील छुपे/ अप्रत्यक्ष खर्च यांमुळे योग्य लाभार्थ्यांना या योजनांखाली लाभ मिळवणे कठीण जात होते.

५ पंचायत समिती खेडकडून मिळालेली माहिती, २०१८-१९.

६ सर्वेक्षणातील फक्त ५२% पालकांना डीबीटी योजना उपयोगाची होती का असे विचारल्यावर हो किंवा नाही असे उत्तर देता आले. उरलेल्या ४८% पालकांनी “माहीत नाही” किंवा “लागू नाही” असे उत्तर दिले.

७. उदाहरणार्थ जातीचे प्रमाणपत्र किंवा उत्पन्नाचा दाखला.




आकृती २: शिक्षण विभागातील पदनिहाय अधिकारी वर्गाची माहिती (वरील आकृती मध्ये फक्त प्रमुख पदांची माहिती दिलेली आहे)

# इतर घटकांशी निगडीत समस्या

या अहवालात शिक्षणाची उपलब्धता, दर्जा आणि शाळांमधील मूलभूत सुविधा यांबद्दलच्या महत्त्वाच्या मुद्यांवर आणि इतर संबंधित घटकांबद्दल चर्चा केलेली आहे, उदा. शिक्षणक्षेत्रावरील नियंत्रणाबद्दलच्या पद्धती, बालकाला शालेय शिक्षणासाठी तयार करण्याची प्रक्रिया (school readiness), आरोग्य, घरातील वातावरण, विद्यार्थ्यांची मनोवृत्ती आणि तेथे सीएसआर-एनजीओंचे कार्य चाललेले आहे का इत्यादी. या सर्व घटकांचा खेड मधील विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर निश्चितच परिणाम होत आहे. परंतु, आम्ही जेव्हा समाजातील प्रतिष्ठित तथा जाणकार व्यक्तींच्या मुलाखती व गट चर्चा घेतल्या (फोकस्ड ग्रुप डिस्कशन- गट चर्चा) केले तेव्हा असे दिसून आले की या तालुक्यात वाहतुकीची व्यवस्था, आरोग्य, पाणीपुरवठा आणि इंटरनेट व टेलिफोनबद्दलच्या सुविधा यांबद्दलच्या ज्या समस्या दिसून आल्या होत्या त्यांचा परिणाम अप्रत्यक्षपणे शिक्षणावर होत होता. उदाहरणार्थ, खेड मधील दुर्गम भागातील आदिवासी प्रदेशात नेटवर्क उपलब्ध नसल्यामुळे, तेथील विद्यार्थ्यांना विविध तंत्रज्ञानांवर आधारीत शिक्षणपद्धतींचा लाभ घेता येत नव्हता आणि मूलभूत सुविधांचा अभाव असल्यामुळे, संगणक विषयक कौशल्येही कमी होती. पाण्याची समस्या, विशेषत: उन्हाळ्यात पाणी नसल्यामुळे स्वछ्तागृहांची पुरेशी स्वच्छता होत नसल्यामुळे अनेकदा त्यांचा उपयोगही करणे शक्य नव्हते. शिवाय, विद्यार्थ्यांच्या जाण्यायेण्याची योग्य सोय नसल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना, विशेषत: मुलींना, उच्च शिक्षणापासून वंचित राहावे लागत होते. तसेच, खेडमधील ग्रामीण भागांमध्ये खाजगी किंवा सार्वजनिक आरोग्य सुविधांचे प्रमाण समाधानकारक नाही. अनेकदा आम्हांस असे दिसून आले की खेड्यांमध्ये आरोग्य सुविधाच उपलब्ध नव्हत्या, किंवा जेथे उपलब्ध होत्या तेथे प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये व उपकेंद्रांमध्ये पुरेशा प्रमाणात कर्मचारी नव्हते.

याच्या अगदी उलट शहरी भागांमध्ये मोठ्या प्रमाणात आरोग्य सुविधा होत्या परंतु तेथे पुरेशा प्रमाणात आवश्यक त्या सेवासुविधा नव्हत्या किंवा तेथील सेवा निम्न आर्थिक गटातील लोकांना परवडण्याजोग्या नव्हत्या.

# शाळा व शालेय प्रवेश

खेड तालुक्यात ५४९ शाळा आहेत व २०१८-१९ या वर्षांत या शाळांमध्ये ९८,६१६ विद्यार्थी होते. पूर्वप्राथमिक गटातील विद्यार्थ्यांचा यात समावेश केला तर एकूण विद्यार्थ्यांची संख्या १,०२,९५४ होती. खेडमधील विद्यार्थ्यांचे प्रमाण सुरूवातीच्या इयत्तांमध्ये खूप जास्त प्रमाणात होते व इयत्ता १ली ते ८ वी मध्ये ७५% विद्यार्थी होते. जातनिहाय वर्गवारीनुसार, एकूण विद्यार्थ्यांपैकी २४% विद्यार्थी ओबीसी (OBC) म्हणजेच इतर मागासवर्गीय जातींतील , तर १०% विद्यार्थी प्रत्येकी एससी आणि एसटी मधील म्हणजेच अनुसूचित जाती व जमातीतील होते. महाराष्ट्र राज्यातील याबाबतची स्थिती ३४% ओबीसी (इतर मागासवर्गीय जाती), १३% एससी (अनुसूचित जाती) आणि १०% एसटी (अनुसूचित जमाती) अशी आहे.

एकूण शाळांपैकी ८३% पेक्षाही जास्त शाळा सरकारी शाळा आहेत किंवा त्यांना सरकारी विभागांचे अनुदान मिळत आहे. या सरकारी विभागांमध्ये शिक्षण विभाग, आदिवासी व सामाजिक कल्याण विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था, उदा. नगर परिषद किंवा नगरपालिका यांचा समावेश आहे. जिल्हा परिषदेतील (ZP) शाळांमध्ये सरासरी नावनोंदणी प्रत्येक शाळेत ८० विद्यार्थी अशी आहे तर खाजगी अनुदानित शाळांमधील नावनोंदणी प्रत्येक शाळेत २८४ विद्यार्थी इतकी आहे व खाजगी ८ शाळांमध्ये ही नावनोंदणी प्रत्येक शाळेत ६८ विद्यार्थी इतकी आहे. बहुतेक शाळा जिल्हा परिषदेतर्फे चालवल्या जातात (३८४ शाळा किंवा ६९.९% ) परंतु यांमधील बऱ्याचशा शाळा केवळ प्राथमिक किंवा प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळा आहेत, म्हणजेच खेड तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये इयत्ता सातवीनंतरचे शिक्षण उपलब्ध नाही.

| 15,50,006 | 1,09,942 | 7,420 | 549 |
|---|---|---|---|
| INDIA | MAHARASHTRA | PUNE DISTRICT | KHED TALUKA |

आकृती ३: शाळांची संख्या

स्रोत : यूडीआयएसइ २०१८-१९




आकृती ४: एकूण शाळा आणि शालेय विद्यार्थी संख्या

स्रोत : यूडीआयएसइ २०१८-१९

खेड तालुक्यात ग्रामीण भागाचे प्रमाण मोठे असल्यामुळे एकूण शाळांपैकी ९३% शाळा आणि एकूण विद्यार्थ्यांपैकी ७७.३% विद्यार्थी ग्रामीण भागात आहेत. ग्रामीण भागातील एकूण शाळांपैकी बहुतेक शाळा जिल्हा परिषदेच्या शाळा आहेत (७३.९%) आणि शहरी भागांमधील शाळांपैकी बहुतेक शाळा स्वयं-अनुदानित शाळा आहेत (३३.३३%). याशिवाय, येथील माहितीवरून असे दिसून येते की शहरी भागातील विद्यार्थ्यांपैकी ४७% विद्यार्थ्यांची नावनोंदणी फक्त ६ खाजगी अनुदानित शाळांमध्ये झालेली आहे, म्हणजेच शहरी भागांमध्ये खाजगी अनुदानित शाळांवर आणि वर्गांवर खूपच ताण पडतो आहे. तसेच, खाली दिलेल्या तक्त्यातून स्पष्ट दिसून येते की, उच्च शिक्षण स्तरांसाठी खूपच कमी शाळा आहेत. विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण मिळवणे ही एक मोठीच समस्या येथे दिसून येत आहे आणि त्याबद्दल यानंतरच्या विभागात चर्चा केलेली आहे.


शाळांमधील विद्यार्थ्यांच्या नावनोंदणीचा अभ्यास करताना मुले व मुली यांचे प्रमाण पाहिले असता असे दिसून येते की निरनिराळ्या गटातील/ प्रवर्गातील नावनोंदणी केलेल्या मुलांची संख्या मुलींपेक्षा जास्त होती. खेडमधील एकूण विद्यार्थ्यांचा विचार केल्यास, लिंग असमानता १२.२ परसेंटेज पॉइंटस[९] इतकी दिसून आली. २०१७-१८ च्या माहितीनुसार पुणे जिल्ह्यात लिंग असमानता फक्त ७.७ परसेंटेज पॉइंटस इतकी होती. सर्व चारही संवर्गांमध्ये, खेडमधील शाळांमधील मुलग्यांची संख्या मुलींच्या संख्येपेक्षा जास्त आहे. ही तफावत ओबीसी (इतर मागासवर्गीय जाती) विद्यार्थी व सामान्य वर्गातील (जनरल कॅटेगरीमधील) विद्यार्थ्यांच्या बाबतीत सर्वात जास्त होती, ज्यात या प्रवर्गातील मुलींचे प्रमाण अनुक्रमे ४२ आणि ४४ टक्के इतके होते, तर याच प्रवर्गातील मुलग्यांची संख्या अनुक्रमे ५८% आणि ५६% इतकी होती.

८ खाजगी शाळांमध्ये येथे स्वत:चे आर्थिक पाठबळ असलेल्या आणि खाजगी विनाअनुदानित शाळांचा समावेश केलेला आहे.

९. २०११ च्या जनगणनेनुसार, खेड तालुक्यातील बालकांचे लिंग प्रमाण (सेक्स रेशो) ८६१ आहे, जेथे ० ते ६ वर्षे वयोगटातील एकूण बालकांपैकी मुलींचे प्रमाण ४७.१० टक्के आहे, तर एकूण लोकसंख्येत लिंग प्रमाण (सेक्स रेशो) ८९२ असून स्त्रियांचे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या ६३.७७% आहे.


समाजातील प्रतिष्ठित तथा जाणकार व्यक्तींच्या मुलाखतींमधून मिळालेली माहिती तसेच निरीक्षणांमधून नोंदवलेल्या माहितीवरून असे दिसते की शिक्षणाबद्दलचे सामाजिक नियम आता बदलत आहेत आणि मुलगा व मुलगी या दोघांनाही शिक्षण मिळावे याबद्दल पालक काळजी घेत आहेत. शहरी भागांमध्ये आणखी एक गोष्ट जाणवली आणि ती अशी की घरात मुलगा असेल तर त्याला खाजगी शाळेत पाठवले जाते तर मुलगी असेल तर तिला सरकारी शाळेत घातले जाते. वर दाखवलेल्या यूडीआयएसई (UDISE) माहितीवरून हे दिसून येते की मुली आणि मुलगे यांची शाळेत नावनोंदणी होण्याच्या बाबतीत इयत्ता १ मध्ये ६.९% तफावत असते तर हेच प्रमाण इयत्ता ९ वीमध्ये २०.४% इतके वाढते आणि त्यानंतर इयत्ता १२ वीच्या बाबतीत ही तफावत पुन्हा ३.५% इतकी कमी होते. मुली आणि मुलगे यांच्यासाठी उपलब्ध असलेल्या शिक्षणाच्या संधी आणि त्याचे परिणाम यांच्या बाबतीत लिंगनिहाय नियमाची महत्त्वाची भूमिका असते हे स्पष्ट दिसून आले आहे. बहुतेक सर्व पालक त्यांच्या मुलांना प्राथमिक शाळेत पाठवत असले तरी माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण घेण्याच्या बाबतीत लिंग व जातीनुसार निर्माण होणारे सामाजिक अडसर, तसेच घरातील आर्थिक परिस्थितीमुळे निर्माण होणारे आर्थिक अडसर व मूलभूत सेवासुविधांच्या अभावामुळे मुली व मुलगे या दोघांनाही उच्च शिक्षणाचा लाभ घेण्यात अडचणी येत असतात.

"मुली जरी घरकाम करीत असल्या तरीदेखील त्या शाळेचा अभ्यास अधिक चांगला करतात. आज स्थिती अशी आहे की मुली मुलग्यांपेक्षा अधिक चांगला अभ्यास करतात. त्यामुळेच मुलगे शाळा का सोडतात आणि मुली शाळा का सोडतात याची कारणे वेगवेगळी आहेत... बहुतेक वेळा पालकांना असे वाटत असते की शेवटी मुलींना घराकडेच लक्ष द्यावे लागणार आहे तर मग त्यांना आणखी शिक्षण देण्याची काय गरज आहे. परंतु मुलग्यांनी शाळा सोडण्याचे कारण वेगळे असते... ते नोकरी शोधण्यासाठी आणि पैसे मिळवण्यासाठी शिक्षण सोडून देतात"
– मुख्याध्यापक १




आकृती ६: शालेय विद्यार्थी प्रवेश

स्रोत : यूडीआयएसइ २०१८-१९




आकृती ५:शालेय शिक्षण परिस्थिती २०१८-१९
स्रोत : यूडीआयएसइ २०१८-१९

## *एससी, एसटी (अनुसूचित जाती, जमाती) मधील विद्यार्थी सरकारद्वारे चालवल्या जाणाऱ्या आणि अनुदान मिळणाऱ्या शाळांमध्ये जास्त प्रमाणात असतात*

आपण यापूर्वी पाहिले आहे की, एकूण शाळांपैकी सरकारद्वारे चालवल्या जाणाऱ्या किंवा सरकारतर्फे अनुदान मिळणाऱ्या शाळांचे प्रमाण सर्वात जास्त आहे, म्हणजेच ४५६ किंवा ८३% शाळा सरकारतर्फे चालवल्या जात असून तेथील विद्यार्थ्यांचे प्रमाण एकूण विद्यार्थ्यांपैकी ७१.५६% इतके आहे. शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी जिल्हा परिषदेच्या शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण (टक्केवारी) जास्त दिसून येते आणि हे प्रमाण एससी (अनुसूचित जाती) - ४३% आणि एसटी (अनुसूचित जमाती) - ५०% प्रवर्गात ते लक्षणीय दिसते[१०].

या माहितीवरून असे दिसून येते की, सरकारद्वारे चालवल्या जाणाऱ्या शाळांवर बहुतांश विद्यार्थी अवलंबून असले तरी सामान्य प्रवर्गातील आणि ओबीसी (इतर मागासवर्गीय ) प्रवर्गात असणाऱ्या व खाजगी अनुदानित शाळांमध्ये जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण जास्त आहे तर एससी (अनुसूचित जाती) व एसटी (अनुसूचित जमाती) प्रवर्गातील विद्यार्थी मोठ्या प्रमाणात जिल्हा परिषदेच्या शाळांत जातात असे दिसत आहे.

१०. याच्या तुलनेत फक्त ३२.७२ टक्के ओबीसी (इतर मागासवर्गीय) विद्यार्थी आणि २६.४७ जनरल (सामान्य) प्रवर्गातील विद्यार्थी यांची जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये नावनोंदणी झाली आहे. येथे आणखी एक गोष्ट नमूद करण्यासारखी आहे, ती म्हणजे एसटी (अनुसूचित जमाती) प्रवर्गातील विद्यार्थ्यांपैकी फक्त ८ टक्के विद्यार्थ्यांची नावनोंदणी सेल्फ-फायनान्स (स्वत:चे आर्थिक पाठबळ असलेल्या ) शाळांमध्ये झालेली आहे, तर हेच प्रमाण ओबीसी (इतर मागासवर्गीय) विद्यार्थ्यांच्या बाबतीत २५.६९%, एससी (अनुसूचित जाती)च्या बाबतीत २०.६९% आणि जनरल (सामान्य) प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या बाबतीत २९.१८% आहे.

# शिक्षणाची उपलब्धता आणि शिक्षणाचा खर्च

शिक्षणाची उपलब्धता किती प्रमाणात आहे याचा अभ्यास केल्यास असे दिसून येते की विद्यार्थ्यांना त्यांची जात, वर्ग, लिंग किंवा भौगोलिक ठिकाण कोणतेही असले तरीदेखील शिक्षणाचा संपूर्ण लाभ घेता येण्यासाठीच्या संधी समन्यायाने उपलब्ध आहेत. या व्याख्येतून शिक्षण मोठ्या प्रमाणात उपलब्ध असल्याचे निर्देशित केले जात असले तरी आम्ही विद्यार्थ्यांना खुद्द शाळांपर्यंत पोचण्यातच किती अडथळे येत आहेत यांकडे लक्ष दिले आहे. आपल्याला माहीत आहेच की, खेडमधील शाळा यंत्रणेची रचना अशी आहे की बहुतांश विद्यार्थी सरकारी शाळांमध्ये जात आहेत. परंतु, सरकारी शाळा उच्च प्राथमिक किंवा इयत्ता ७/८ वीपर्यंतच आहेत. त्यामुळे, प्राथमिक व उच्च प्राथमिक शिक्षणानंतर जेव्हा विद्यार्थ्यांना माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण करायचे असते तेव्हा त्यांना खूप लांबवर जावे लागते आणि त्यांच्या कुटुंबांना शिक्षणाचा वाढीव खर्च सोसावा लागतो. यामुळे मुलींवर आणि निम्न उत्पन्न गटातील आणि संवेदनशील (असुरक्षित) समाजामधील विद्यार्थ्यांवर खूपच जास्त परिणाम होत असलेला दिसून येतो. त्यामुळेच, एकीकडे या भागात प्राथमिक व उच्च प्राथमिक इयत्तांच्या शाळा तुलनेने जास्त प्रमाणात उपलब्ध असतानाच उच्च शिक्षण किंवा व्यवसाय शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना मात्र ते उपलब्ध होत नाही किंवा उपलब्ध असले तरी त्याबद्दलचा खर्च खूपच जास्त असतो, त्यामुळे हे विद्यार्थी उच्च शिक्षण घेऊ शकत नाहीत.

### *उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांची संख्या कमी आहे*

येथील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्याच्या कमी संधी उपलब्ध आहेत व त्याचे कारण म्हणजे या तालुक्यात उच्च शिक्षण पुरवणाऱ्या संस्थांची संख्या पुरेशी नाही. या तालुक्यातील एकूण ५४९ शाळांपैकी, फक्त ९४ शाळांमध्ये माध्यमिक शिक्षणाच्या इयत्ता (९ वी व १० वी) आहेत, तर फक्त ३५ शाळांमध्ये उच्च माध्यमिक इयत्ता ( ११ वी व १२ वी) आहेत. या माहितीवरून असे दिसून येते की खेडुमधील दर १० प्राथमिक शाळांमागे ६.३६ उच्च माध्यमिक शाळा, ५ माध्यमिक शाळा आणि फक्त १.६० उच्च माध्यमिक शाळा आहेत.

पालक, शिक्षक आणि समाजातील सदस्यांच्या मतानुसार, विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण देणे हे महत्त्वाचे आहे, कारण अनेक पालकांना सध्या दिल्या जाणाऱ्या सामान्य शिक्षणपद्धतीत अगदीच कमी मूल्ये किंवा काहीच मूल्य नाही असे वाटत आहे. त्यांचे असे मत आहे की ज्याचा आजच्या वस्तुस्थितीशी जवळचा संबंध आहे आणि ती वस्तुस्थिती अशी आहे की सध्याच्या शिक्षणपद्धतीमुळे विद्यार्थ्यांमध्ये रोजगार मिळवण्याची किंवा कौशल्ये मिळवण्याची क्षमता निर्माण होत नाही आहे. परंतु, या भागात एकूणच व्यवसाय प्रशिक्षण देणाऱ्या शैक्षणिक संस्थांची संख्या फारच थोडी आहे. येथे अशा केवळ ४ संस्था आहेत[११]. ज्या संस्था कार्यरत आहेत तेथेही मर्यादित प्रमाणातच स्रोत आहेत. पालकांना असे वाटते की विद्यार्थ्यांना शाळांमध्ये पुरेशा प्रमाणात शिक्षण दिले जात नाही आणि त्यामुळे त्यांना अशा संधींबद्दलची माहिती मिळत नाही. त्यामुळेच अशा संस्थांपर्यंत विद्यार्थी न पोचण्यात अधिकच अडचणी निर्माण होतात.

| | शाळांची संख्या |
|---|---|
| इयत्ता १० वी असलेल्या शाळांची संख्या | ९४ |
| ११ वी इयत्ता असलेल्या शाळांची/ज्युनियर कॉलेजांची संख्या | ३५ |
| इयत्ता १२ वी असलेल्या शाळांची/ ज्युनियर कॉलेजांची संख्या | ३५ |

तक्ता : माध्यमिक/ उच्च माध्यमिक इयत्ता असलेल्या शाळांची संख्या

स्रोत : यूडीआयएसइ २०१८-१९

११. अभ्यासाच्या कालावधीदरम्यान, टीमला या तालुक्यातील व्यावसायिक संस्थांची नेमकी संख्या पडताळून पाहता आली नाही. ऑनलाइन माहितीसाठ्यानुसार आम्हाला १७ संस्था दिसल्या परंतु आम्हाला ज्यांनी माहिती दिली त्यांना फक्त चार संस्थांबद्दल माहिती होती.

## *शिक्षणावरील खर्च*

उच्च प्राथमिक स्तरापर्यंत सरकारी शाळांमधील शिक्षण मोफत असले आणि शिक्षणासाठी कोणतेही शुल्क आकारले जात नसले तरी, पालकांना अप्रत्यक्ष खर्च अनेक प्रकारे करावा लागतो, उदा. स्टेशनरी व वाहतुकीचा खर्च. सदरच्या सर्वेक्षणात आम्हांस असे दिसून आले की सरकारी अनुदान मिळणाऱ्या शिक्षणातदेखील, पालकांनी मुलांच्या शिक्षणासाठी दर वर्षी केलेला खर्च रू. ४,९६८ ते रू. १०,८८४ दरम्यान होता. विशेषत:, एमआयडीसी भागात हा खर्च अगदी सुरूवातीच्या इयत्तांसाठीही रू. ४००० - रू. ५००० पर्यंत जाऊ शकतो आणि जसजसा विद्यार्थी पुढच्या इयत्तांमध्ये पोचतो तसतसा हा खर्च रू. ६००० पेक्षाही जास्त होऊ शकतो[१२]. जी कुटुंबे आर्थिकदृष्ट्या कमकुवत असतात त्यांच्यासाठी शिक्षणाशी संबंधित हा खर्च सोसणे कठीण जाते. कमी उत्पन्न गटातील कुटुंबांना त्यांच्या घरातील मुलांच्या दररोजच्या गरजांसाठी पैसे पुरवणे कठीण जात असते आणि जसजसे मूल वरच्या इयत्तेत जाते तसतसे संबंधित प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष खर्च पालकांसाठी एक मोठेच ओझे होते[१३].

## *जाण्यायेण्याची (वाहतूक) व्यवस्था आणि सुरक्षितता*

खेड तालुक्यातील वाहतुकीच्या पद्धती व सुविधा यांचाही विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध होण्याशी फार जवळचा संबंध आहे. प्राथमिक शाळांतले बहुतेक विद्यार्थी शाळेत चालतच येत असतात आणि त्यांचे घरापासून शाळेपर्यंतचे अंतर ४ किलोमीटर्सपर्यंत असू शकते. गटचर्चमध्ये (फोकस्ड ग्रुप डिस्कशन्स) भाग घेणाऱ्यांनी आणि आम्ही ज्यांची मुलाखत घेतली त्यांनी सांगितले की शहरी आणि ग्रामीण प्रदेशांच्या तुलनेत आदिवासी भागांमध्ये प्रदेश सपाट नसल्यामुळे विद्यार्थ्यांना घरून शाळेत पोचण्यासाठी एक तास किंवा त्यापेक्षाही जास्त वेळ लागू शकतो. शहरी भागात, विद्यार्थ्यांना घरून शाळेत पोचण्यासाठी सरासरी १८ मिनिटे लागतात, तर ग्रामीण भागात सरासरी १४.५ मिनिटे वेळ लागतो, असे आमच्या सर्वेक्षणात दिसून आले. परंतु आदिवासी भागांमध्ये हाच वेळ २१.३ मिनिटे इतका होता. आमच्या सर्वेक्षणातून असे दिसून आले, की ४०% पेक्षाही जास्त




आकृती ६: विद्यार्थ्यांसाठी शाळेत जाण्यासाठी लागणारा वेळ

१२ विविध सदस्य संख्या असलेल्या कुटुंबांसाठी शिक्षणाचा प्रति वर्ष, प्रति बालक सरासरी खर्च पाहण्यासाठी मूळ अहवाल पहावा.

१३ सर्वेक्षणाच्या प्रतिसादानुसार

विद्यार्थ्यांनी हे मान्य केले की शाळेत जाण्या-येण्यासाठी खूप लांब चालावे लागते व ते फारच अडचणीचे होते. एसटी (अनुसूचित जमाती) प्रवर्गातील ६०% पेक्षाही जास्त विद्यार्थ्यांनी हे मान्य केले. शिवाय, जेव्हा विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी खूप दूर जावे लागते तेव्हा शिक्षणासाठीच्या अप्रत्यक्ष खर्चात वाहतुकीच्या खर्चाची भरच पडते.

विश्वसनीय, सुरक्षित व नियमितपणे मिळू शकेल अशा सार्वजनिक वाहतूक सेवेचा अभाव हा उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मार्गातील मोठाच अडथळा होता. विशेषत: मुख्य रस्त्यांपासून दूर असणाऱ्या ठिकाणी जे विद्यार्थी राहात होते त्यांच्या बाबतीत ही अडचण अधिकच जास्त होती. प्राथमिक माहितीत नमूद केल्यानुसार येथे बसेसची संख्या पुरेशी नाही आणि प्रमुख व्यक्तींच्या मुलाखतींमधून हेही दिसून आले की या बसेसची स्थितीही चांगली नाही. या बसेस वारंवार रस्त्यातच नादुरूस्त होतात आणि त्यामुळे प्रवाशांना वाटेतच खोळंबून राहावे लागते, त्यामुळे ही बससेवा विश्वसनीय म्हणता येत नाही. बसेस वारंवार नादुरूस्त होत असल्यामुळे सार्वजनिक प्रवास व्यवस्थेची वाट पाहण्यात भरपूर वेळ फुकट जातो आणि विद्यार्थी शिक्षणापासून दूर राहण्यातला तो एक घटक बनतो. ज्या मुलींना उच्च शिक्षण घेण्याची इच्छा असते त्यांच्या बाबतीत हे विशेषत्वाने दिसून येते, कारण बससाठी खूप वेळ थांबावे लागले तर त्यांना सार्वजनिक ठिकाणी कधीकधी छेडछाडीला किंवा हिंसाचारालाही तोंड द्यावे लागू शकते. शिवाय, जर वाहतुकीची व्यवस्था विश्वसनीय नसेल तर मुली शिक्षण सोडून देण्याची शक्यता जास्त असते, कारण मुलींनी घराबाहेर कुठे जायचे यावर घरच्यांचे कडक नियंत्रण असते. आम्हाला असेही दिसून आले की अनेक विद्यार्थ्यांच्या बाबतीत बसेसच्या येण्याजाण्याच्या वेळा आणि शाळा/कॉलेजच्या वेळा एकमेकांशी जुळणाऱ्या नव्हत्या. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना सकाळी किंवा संध्याकाळी वर्गात हजर राहता येत नाही व त्याचा त्यांच्या शैक्षणिक निकालावर परिणाम दिसून येतो.

# शाळेतील सुविधा

सदरच्या अभ्यासात आम्हांस असे दिसून आले की खेड मधील आदिवासी भाग सोडल्यास इतर बऱ्याचशा भागातील एकूण सुविधा पुरेशा म्हणता येतील अशा आहेत. २०१८-१९ च्या यूडीआयएसई (UDISE) माहितीनुसार, जेथे एसटी (अनुसूचित जमाती) मधील विद्यार्थ्यांची संख्या जास्त होती अशा शाळांमध्ये मूलभूत सुविधांची स्थिती समाधानकारक नव्हती[१४]. यात विजेची उपलब्धता कमी असणे (८ परसेंटेज पॉइंटसनी), इंटरनेटची उपलब्धता कमी असणे (२५ परसेंटेज पॉइंटसनी), एक कार्यरत डेस्कटॉप (संगणक) उपलब्ध असणे (९ परसेंटेज पॉइंटसनी), जास्त वर्गखोल्यांची किरकोळ दुरूस्ती करणे आवश्यक आहे (४ परसेंटेज पॉइंटसनी), जास्त वर्गखोल्यांची मोठी दुरूस्ती करणे आवश्यक आहे (३ परसेंटेज पॉइंटसनी), तसेच मुलांसाठी व मुलींसाठी चालू स्थितीत असलेली टॉयलेटस कमी संख्येत असलेल्या शाळा ( अनुक्रमे ४ आणि २ परसेंटेज पॉइंटसनी) यांचा समावेश आहे.

### *शाळेची इमारत*

खेडमध्ये, एकूण शाळांपैकी जवळजवळ ४४% शाळांमध्ये दोन छोट्या वर्गखोल्या असून तेथे शाळेतील मुलांची संख्या सरासरी ११ इतकी आहे. शिवाय, जिल्हापरिषद शाळांबद्दलच्या माहितीनुसार, २५ शाळांतील ५२ वर्गखोल्यांची स्थिती अत्यंत वाईट आहे, तर ५२ शाळांतील १४१ वर्गखोल्यांची स्थिती अंशत: खराब आहे. आम्हाला असेही दिसले की शहरी भागात शाळांमध्ये विद्यार्थ्यांची नावनोंदणी जास्त आहे आणि या शाळांमध्ये नावनोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांच्या संख्येच्या तुलनेत वर्गखोल्यांची संख्या कमी होती. शाळेची इमारत नसेल किंवा वर्गखोल्या नसतील तर ते विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या शिक्षणाच्या गुणवत्तेसाठी बाधक ठरू शकेल, विशेषतः ज्या भागांमध्ये विद्यार्थ्यांना इतर अधिक चांगल्या ठिकाणी शिक्षण घेण्याच्या संधी उपलब्ध नसतील तेथे हे अधिक जाणवेल.

१४ येथे ज्या शाळांमध्ये एसटी (अनुसूचित जमाती) मधील विद्यार्थ्यांचे प्रमाण जास्त होते त्यांचे वर्गीकरण एकूण एसटी (अनुसूचित जमाती) लोकसंख्येच्या २३% जास्त असलेल्या शाळा असे केले गेले, जेथे सर्व शाळांमधील एसटी (अनुसूचित जमाती) मधील विद्यार्थ्यांची सरासरी संख्या २३.६% होती. यातील हिशेबानुसार १७५ शाळांचे वर्गीकरण जास्त प्रमाणात आदिवासी विद्यार्थी असलेल्या शाळा असे केले गेले.

| महत्त्वाचे निर्देशक | भारत | महाराष्ट्र | पुणे जिल्हा | खेड तालुका |
| --- | --- | --- | --- | --- |
| जिथे पिण्यायोग्य पाणी उपलब्ध आहे अशा शाळांची टक्केवारी | ८९.९७% | ९७.१२% | ९५.७०% | ९५.६२% |
| जिथे मुलग्यांसाठी वापरण्यायोग्य स्वतंत्र टॉयलेटस आहेत अशा शाळांची टक्केवारी | ८९.२०% | ९१.३४% | ९५.१३% | ९२.१६% |
| जिथे मुलींसाठी वापरण्यायोग्य स्वतंत्र टॉयलेटस आहेत अशा शाळांची टक्केवारी | ९१.४९% | ९३.४३% | ९६.२९% | ९६.२६% |
| जिथे वापरण्यायोग्य काँप्युटर आहेत अशा शाळांची टक्केवारी | २०.३०% | ५६.०६% | ७०.९८% | ७२.८५% |

तक्ता : शाळांमधील शैक्षणिक परिस्थिती (२०१८-१९)
स्रोत : यूडीआयएसइ २०१८-१९

आमच्या निरीक्षणांतून आम्हाला असेही दिसून आले की शाळेच्या इमारतीची स्थिती कशीही असली तरी शाळेतील वर्गखोल्यांची संख्या मर्यादित होती आणि शाळेत योग्य सुविधा नसल्यामुळे किंवा एखाद्या दिवशी शाळेत शिक्षक नसल्यामुळे विद्यार्थ्यांना अनेकदा एकाच वर्गखोलीत बसावे लागत होते.

## *ग्रंथालय*

खेडमधील अनेक शाळांमध्ये ग्रंथालय नव्हते असे दिसून आले. यूडीआयएसई (UDISE) माहितीनुसार, ५ शाळांपैकी १ शाळेत ग्रंथालय नव्हते. म्हणजेच खेडमधील १९.३०% शाळांमध्ये ग्रंथालयची सुविधा नाही, तर पुणे जिल्ह्यातील ७.२% शाळांमध्ये ग्रंथालयची सुविधा नाही. आम्ही ज्यांच्या म ुलाखती घेतल्या त्यांनी सांगितल्यानुसार पुस्तकांचा दर्जा सुमार आणि विद्यार्थ्यांच्या वयानुरूप नव्हता. सर्वेक्षणातूनही हे दिसून आले, ज्यात फक्त ६२% विद्यार्थ्यांनी ग्रंथालय उपलब्ध आहे का याचे उत्तर देताना "खूपच समाधानी" असल्याचे नोंदवले तर हेच प्रमाण एसटी (अनुसूचित जमाती) प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या बाबतीत ३१% इतके होते.


## *वीज उपलब्ध असणे*

खेडमधील ग्रामीण आणि आदिवासी भागातील जवळजवळ सर्वच शाळांमध्ये वीज नेहमीच उपलब्ध असते असे नाही. ही स्थिती कनेक्शन नसल्यामुळे किंवा सुविधा नसल्यामुळे नाही तर शाळेला बिले भरणे अशक्य झाल्यामुळे निर्माण झालेली आहे. एका उत्तरदात्याने सांगितल्यानुसार, विजेची बिले अनेकदा मीटरचे प्रत्यक्ष रीडिंग घेऊन तयार केली जात नाहीत आणि त्यामुळे या बिलांची रक्कम काहीही असू शकते. एका शाळेच्या बाबतीत, हे बिल दर महिना रू. ६०० ते दर महिना रू. २१०० असे येत होते. कधीकधी शाळेला होणारा वीजपुरवठादेखील अनियमित असतो, त्यामुळे शिक्षकांना आणि शाळेच्या पदाधिकाऱ्यांना बिले भरण्याची इच्छा नसते. काही एनजीओंनी (स्वयंसेवी संस्थांनी) सोलर किटस देऊन सहाय्य केले आहे, त्यामुळे काही शाळांना मर्यादित प्रमाणात तंत्रज्ञानावर आधारीत शिक्षणपद्धती राबवण्यासाठी मदत झालेली आहे.

## *शाळेतील स्वच्छतागृहे (टॉयलेटस)*

खेडमध्ये शाळांमधील स्वच्छतागृहांची एकूणच स्थिती समाधानकारक नव्हती, हे शिक्षकांच्या सर्वेक्षणातून मिळालेल्या उत्तरांवरूनही दिसून आले आहे. असे असले तरी ७५% शिक्षकांना असे वाटत होते की शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी पुरेशा प्रमाणात स्वच्छतागृहे उपलब्ध आहेत. पुरूष शिक्षकांच्या तुलनेत स्वच्छतागृहांची संख्या पुरेशी होती असे वाटणाऱ्या शिक्षिकांची संख्या १०% ने कमी होती. यूडीआयएसइनुसार, खेड तालुक्यात १६ शाळा अशा आहेत जेथे मुलग्यांसाठी चालू स्थितीतील स्वच्छतागृहे नाहीत, ज्याचे परिणाम १४२० मुलग्यांना भोगावे लागत आहेत, तर २९ शाळा अशा होत्या जिथे मुलींसाठी योग्य स्वच्छतागृहे नाहीत त्याचे परिणाम २६२९ मुलींना भोगावे लागत आहेत. एकूण शाळांपैकी ४१ शाळा अशा आहेत जेथे मुलींसाठीच्या स्वच्छतागृहांचे प्रमाण प्रति टॉयलेट ५० विद्यार्थी इतके आहे तर ५७ शाळा अशा आहेत जेथे मुलग्यांसाठीच्या चालू स्थितीतील स्वच्छतागृहांचे प्रमाण प्रति टॉयलेट ५० विद्यार्थी इतके होते.

अनेक शाळांच्या बाबतीत असे दिसले की जरी स्वच्छतागृहे (टॉयलेटस) बांधली गेली होती तरी त्यांची देखभाल व स्वच्छता यांवर खूपच मर्यादा होत्या. आदिवासी भागात पाण्याचा नियमितपणे पुरवठा होत नाही, त्यामुळे टॉयलेटस स्वच्छ ठेवणे कठीण जाते. यूडीआयएसइ माहितीनुसार फक्त ४१.५% शाळांमध्ये त्यांच्याकडील चालू स्थितीतल सर्व टॉयलेटसमध्ये पाणी उपलब्ध असते. शिवाय, पालकांपैकी ६२% पालकांनी टॉयलेटसचा एकूण दर्जा चांगला असल्याचे नोंदवले तर शहरी भागात हे प्रमाण ४२% आणि आदिवासी भागात ३८% पर्यंत कमी झालेले दिसते.




आकृती ७: शाळेतील स्वच्छतागृह संख्येबाबत पालकांचा प्रतिसाद

## *तंत्रज्ञान*

खेडमधील सर्वच घटकांमधून तंत्रज्ञानाचा उपयोग करून शिक्षण दिले जावे अशी मागणी केली जाते आहे, परंतु शाळांमधील तंत्रज्ञानासंबंधीच्या मूलभूत सुविधा फारच थोड्या आणि असमाधानकारक होत्या असे मत आमच्या सर्वेक्षणात भाग घेणाऱ्या पालकांपैकी निम्म्यापेक्षा जास्त पालकांनी नोंदवले आहे. ४६% पालकांनी तंत्रज्ञानासंबंधीच्या सुविधा चांगल्या असल्याचे मत नोंदवले, परंतु शहरी भागात हे प्रमाण ३६% पर्यंत खाली आहे आणि आदिवासी भागातील पालकांमध्ये हे प्रमाण त्यापेक्षाही कमी होते (२५%). यातील महत्त्वाचे मुद्दे म्हणजे उपकरणांना चार्ज करण्यासाठी वीजपुरवठा उपलब्ध नसणे, विशेषत: खेडमधील आदिवासी भागांमध्ये इंटरनेट कनेक्शन नसणे, यांपासून ते एकूण शाळांपैकी २७% शाळांम ध्ये चालू स्थितीतील एकही संगणक नसणे यांपर्यंतचे सर्व मुद्दे नोंदवले गेले होते. कॉंप्युटर कसा वापरायचा हे बहुसंख्य विद्यार्थ्यांना माहीत नव्हते आणि आम्ही ज्यांच्या मुलाखती घेतल्या त्यांच्या मते रोजगार मिळवायची पात्रता वाढवण्यासाठी कॉंप्युटरचा उपयोग करता येणे खूपच महत्त्वाचे होते. अशा तफावतीमुळे वर्गात शिकवण्याच्या आणि शिकण्याच्या पद्धतींवरही परिणाम होईलच परंतु विद्यार्थ्यांना काम/नोकऱ्या मिळवण्यासाठी आवश्यक कौशल्ये व संधी मिळवण्यावरही मर्यादा येईल.

## *सीडब्ल्यूएसएन (चिल्ड्रेन विथ स्पेशल नीडस वशेष गरजा असलेली बालके) बद्दलच्या सुविधा*

ज्या विद्यार्थ्यांना विशेष सुविधांची गरज आहे अशांसाठी या शाळांमध्ये ज्या सुविधा निर्माण केल्या गेल्या आहेत त्यांचे प्रमाण मर्यादित आहे व मुख्यत: रँप (उतार असलेला मार्ग) पुरवण्यापुरत्याच त्या मर्यादित आहेत. यूडीआयएसइनुसार या सुविधा १४% शाळांमध्ये अजूनही उपलब्ध नाहीत असे दिसते. परंतु, एका उत्तरदात्याने सांगितले की अशा प्रकारचे रँप्स बहुतेक शाळांमध्ये उपलब्ध नाहीत. शिवाय, सर्वेक्षणातील ५०% पेक्षा जास्त शिक्षकांनी सांगितले की शारीरिक अपंगत्व असलेल्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या सुविधा पुरेशा नाहीत. विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांबरोबर कसे काम करायचे/वागायचे याबद्दल शिक्षकांना जे प्रशिक्षण दिले जाते त्याचा दर्जा चांगला नसतो किंवा असे प्रशिक्षण दिलेच जात नाही, असे आम्हांस मुलाखतींतून समजले.

# विद्यार्थ्यांशी संबंधित महत्त्वाचे मुद्दे व गरजा

खेडमधील शिक्षणतज्ज्ञांना जाणवणारी आणखी एक चिंता म्हणजे हे विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी तयार आहेत का? ही होती. या विद्यार्थ्यांची मूलभूत कौशल्येच (प्राथमिक शिक्षण) नीट तयार झालेली नसल्यामुळे ते वरच्या इयत्तांतील शिक्षणासाठी तयार नसतात. पालकांनी सुरुवातीच्या वर्षांमध्ये फारसे लक्ष न देणे आणि विद्यार्थ्यांना कोणत्याही इयत्तेत नापास करायचे नाही हे धोरण असणे ही मुलांची हजेरी कमी असण्याची आणि त्यामुळेच विद्यार्थ्यांची मूलमूत कौशल्ये कमी असण्याची मुख्य कारणे असल्याचे सांगितले गेले. ग्रामीण आणि आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक गोष्टींचा परिचयही नसतो आणि त्यामुळे हे विद्यार्थी उच्च शिक्षण घेऊन चांगली नोकरी/काम मिळवण्यासाठी फारसे उत्साही नसतात. यासाठीच, या विद्यार्थ्यांनी अभ्यासाकडे आकर्षित व्हावे असे वाटत असेल तर विद्यार्थ्यांना आधुनिक जगाचा परिचय करून देणे आवश्यक आहे असे वाटते.

आम्हाला असे दिसून आले की विद्यार्थ्यांची हजेरी कमी असण्याची व गैरहजेरीची अनेक कारणे आहेत, आणि खेडमधील शिक्षणतज्ज्ञांनी काही महत्त्वाचे मुद्दे सांगितले, ते पुढीलप्रमाणे:

- जर विद्यार्थ्यांना वर्गात काय शिकवले जात आहे ते समजत नसेल, तर ते शाळा बुडवायचा विचार करतात. जर विद्यार्थ्यांना ज्या माध्यमातून शिक्षण दिले जाते आहे ती भाषा समजत नसेल आणि वरच्या वर्गात गेले तरी मूलभूत संकल्पनाच नीट स्पष्ट झालेल्या नसतील तर हे जास्त दिसून येते.
- बहुतेक सर्व विद्यार्थी शाळेत चालत येतात, त्यामुळे खूप दूर राहणारे विद्यार्थी किंवा ज्यांना तालुक्यातील पश्चिम भागातील डोंगराळ भागातून चालत यावे लागते, असे विद्यार्थी हवामान ठीक नसेल तेव्हा शाळेत येऊ शकत नाहीत.

- जर विद्यार्थ्यांना वर्गात काय शिकवले जात आहे ते समजत नसेल, तर ते शाळा बुडवायचा विचार करतात. जर विद्यार्थ्यांना ज्या माध्यमातून शिक्षण दिले जाते आहे ती भाषा समजत नसेल आणि वरच्या वर्गात गेले तरी मूलभूत संकल्पनाच नीट स्पष्ट झालेल्या नसतील तर हे जास्त दिसून येते.
- बहुतेक सर्व विद्यार्थी शाळेत चालत येतात, त्यामुळे खूप दूर राहणारे विद्यार्थी किंवा ज्यांना तालुक्यातील पश्चिम भागातील डोंगराळ भागातून चालत यावे लागते, असे विद्यार्थी हवामान ठीक नसेल तेव्हा शाळेत येऊ शकत नाहीत.

- कधीकधी पालकांनाच विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिक्षणाचे महत्त्व पटलेले नसते. अशा वेळी, विद्यार्थी शाळा चुकवण्याची शक्यता जास्त असते.
- जर शाळेतील वातावरण मैत्रीपूर्ण नसेल, विशेषत: जर शाळेत मुलांना मार दिला जात असेल किंवा सर्वांच्या देखत अपमान केल्यामुळे भावनिक ताणतणाव निर्माण होत असतील किंवा मित्रांमध्ये ताणतणावाची स्थिती असेल तर विद्यार्थ्यांचा शाळा बुडवण्याकडे कल वाढतो.
- जर खूपच जास्त गृहपाठ दिला जात असेल, तर विद्यार्थी शाळा बुडवण्याची शक्यता असते, आणि त्यातूनच शाळा सोडून देण्याचेही प्रमाण निर्माण होत असते.
- काही विशिष्ट गटांची/ समाजांची आर्थिक परिस्थिती कमकुवत असल्यामुळे विद्यार्थ्यांना शेतीच्या मोसमात शेतीच्या कामांमध्ये मदत करावी लागते. अशा वेळी, विद्यार्थी शाळा बुडवतात.

या अभ्यासादरम्यान, यांपैकी अनेक घटकांबद्दल विशेष तपासणी केलेली नाही परंतु हे मुद्दे संपूर्णपणे समजून घेण्यासाठी त्यांबाबत आणखी अभ्यास करण्याची आणि माहिती गोळा करण्याची आवश्यकता आहे.

## *शालाबाह्य मुले*


वय वर्षे ६ ते १४ दरम्यानची आणि शाळेत कधीही न आलेली मुले किंवा ज्या मुलांची नावे सुरूवातीला शाळेत घातलेली होती परंतु त्यांना प्राथमिक शिक्षण पूर्ण करता आले नाही, अशा मुलांचे वर्गीकरण शालाबाह्य मुले असे शिक्षण हक्क कायदा, २००९ (RTE Act 2009) शिक्षणाचा हक्क कायद्यात केलेले आहे[१५]. या व्याख्येत प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या अशा मुलांचा समावेश केलेला आहे, जी मुले सलग एका महिन्यापेक्षा जास्त काळपर्यंत शाळेत आलेली नाहीत. खेडमधील २०१८-१९ मधील शाळाबाह्य मुलांच्या यादीत, एकूण ९५१ विद्यार्थी आहेत, जी शालाबाह्य मुले आहेत, त्यांपैकी ६५% मुलगे आहेत. २०१७-१८ मध्ये १०१० विद्यार्थ्यांचे वर्गीकरण शालाबाह्य मुले असे केले गेले होते, व त्यांत मुलगे व मुली यांची टक्केवारी सारखी होती.

शाळेत येणे बंद करणाऱ्या मुलांमध्ये मुलींचे व मुलग्यांचे सरासरी वय २०१८-१९ मध्ये सारखेच होते : अनुक्रमे ९.५ वर्षे आणि ९.४ वर्षे. शाळाबाह्य सर्व मुलांपैकी, बहुतेक मुलांनी शाळा सोडण्याचे कारण "नोकरी" हेच सांगितले.शाळाबाह्य असणाऱ्या एकूण मुलांपैकी जवळजवळ २३% मुले ओबीसी (इतर मागासवर्गीय जाती) मधील आहेत. यानंतर सामान्य प्रवर्गातील मुले आहेत (१८%).

सविस्तर माहितीवरून (क्वालिटेटिव्ह डेटा) असे दिसून आले की या तालुक्यात शाळाबाह्य मुलांची समस्या नाही. कोणीही मूल ८ व्या इयत्तेपूर्वी शाळा सोडून जात नाही आणि इयत्ता आठवीनंतर जी मुले शाळा सोडतात ती आदिवासी सम ाजातील असतात. खरे तर, आदिवासी समाजातील बहुसंख्य मुले ८ व्या व १० व्या इयत्तेनंतर शाळेत येतच नाहीत, हे तज्ज्ञांशी बोलल्यानंतर आणि केस स्टडीजमधून समजले. परंतु, या मुद्यावर अधिक सखोल विश्लेषण करण्याची गरज आहे.

## *विद्यार्थ्यांच्या गरजा*

जेव्हा विद्यार्थ्यांना थेटपणे विचारले, तेव्हा विद्यार्थ्यांनी पुढील गरजांचा उल्लेख केला - शाळेत येण्यासाठी प्रवासाची अधिक चांगली सुविधा, शाळेत स्वच्छ व पुरेशा प्रमाणात स्वच्छतागृहे (टॉयलेटस) असणे, ग्रामीण आणि आदिवासी भागांतील शाळांत कॉम्प्युटर आणि तंत्रज्ञानावर आधारीत उपकरणे असणे आणि जेथे विद्यार्थ्यांची संख्या जास्त असते त्या वर्गखोल्यांमध्ये विद्यार्थ्यांना नीट बसता येईल अशी आसनव्यवस्था असणे. सर्वेक्षणातून, मुलाखतींमधून आणि केस स्टडीजमधून जी माहिती गोळा करण्यात आली, त्यातून असे दिसून आले की विद्यार्थ्यांनी ज्या त्रुटी दाखवल्या होत्या त्याच




आकृती ९: खेडमधील २०१७-१८ आणि २०१८-१९ मधील शालाबाह्य मुलांची संख्या
स्रोत: पंचायत समिती, खेड

१५. महाराष्ट्रातील आरटीई नियमांबद्दल अधिक माहितीसाठी पहा: https://mhrd.gov.in/sites/upload_files/mhrd/files/upload_document/ccs_rte-rules_maharashtra_1.pdf

इतरही अनेक हितधारकांनी (स्टेकहोल्डर्सनी) / संबंधित व्यक्तींनी दाखवलेल्या होत्या. परंतु, विद्यार्थ्यांनी वर्गांमधील शिकवण्याची-शिकण्याची पद्धत सुधारण्याची गरज थेटपणे व्यक्त केलेली नव्हती, तसेच शाळेतील एकूण वातावरण बदलण्याची गरज सांगितली नव्हती. तसेच त्यांना घरी ज्या आर्थिक प्रश्नांना तोंड द्यावे लागते त्याबद्दलही सांगितले नाही. त्यामुळेच, विद्यार्थ्यांनी ज्या गरजांचा उल्लेख केला त्या खेड तालुक्यातील विद्यार्थ्यांच्या बाबतीत ज्या समस्या/अडचणी आहेत त्यांपैकी फक्त अंशत: गरजा येथे व्यक्त करण्यात आल्या असेच म्हणावे लागेल.

# शिक्षकांशी संबंधित महत्त्वाचे मुद्दे व गरजा

UDIES डेटा (माहिती) नुसार खेड तालुक्यात एकूण ३,५८४ शिक्षक आहेत. खेड तालुक्यातील १२ शाळांमध्ये फक्त एकच शिक्षक आहे, अशा शाळांचे प्रमाण सुमारे २% इतके आहे. परंतु, बऱ्याच शाळा या छोट्या शाळा आहेत कारण ४३% शाळांमध्ये फक्त २ शिक्षक आहेत. खेडमधील जिल्हा परिषद शाळांमधील १४६७ शिक्षकांपैकी, २३४ शिक्षकांच्या नेमणुका "कठीण"[१६] असे वर्गीकरण केलेल्या भागांमध्ये करण्यात आल्या आहेत आणि उरलेल्या १२३३ शिक्षकांच्या नेमणुका सामान्य शाळांमध्ये करण्यात आलेल्या आहेत.

## *शास्त्र विषयाच्या शिक्षकांची पदे सर्वात जास्त प्रमाणात रिकामी आहेत*

२०१८-१९ या शैक्षणिक वर्षात, जिल्हा परिषदेच्या ४०२ शाळांमध्ये १५९४ शिक्षकांची पदे आहेत व एकूण विद्यार्थ्यांची संख्या ३०,९२३ आहे. या शिक्षक पदांपैकी १४५९ पदे भरलेली आहेत आणि एकूण १३५ शिक्षकांची पदे रिकामी आहेत. शास्त्र विषयाच्या शिक्षकांची पदे सर्वात जास्त प्रमाणात रिकामी आहेत आणि एकूण ३३ पदांपैकी केवळ ९ पदांवर नेमणुका झाल्या आहेत. भाषा आणि समाज शास्त्राच्या शिक्षकांची पदे रिकामी असण्याचे प्रमाण तुलनेने कमी आहे.

विद्यार्थी-शिक्षक गुणोत्तर (प्रमाण) सर्वात जास्त उच्च माध्यमिक वर्गासाठी आणि शहरी वर्गासाठी दिसून आले आहे. या ब्लॉकमधील नावनोंदणी केलेले विद्यार्थी आणि शिक्षकांची संख्या यांचा विचार केला तर असे दिसून येते की नावनोंदणी केलेल्या प्रत्येक २८ विद्यार्थ्यांसाठी १ शिक्षक आहे. वर दिलेल्या तक्त्याखेरीज, ज्या शाळांमध्ये फक्त उच्च माध्यमिक इयत्ता आहेत, म्हणजेच जी ज्युनियर कॉलेजेस आहेत तेथे विद्यार्थी-शिक्षक हे प्रमाण सर्वात जास्त आहे, तेथे प्रत्येक शिक्षक/वर्गासाठी ५६ विद्यार्थी आहेत, त्यामुळे अशा शाळांमध्ये शिक्षकांची गरज आहे हेच यावरून दिसून येते.

| इयत्ता | विद्यार्थी-शिक्षकांचे सरासरी प्रमाण | आरटीइ/आरएमएसए नियमांतील संख्येपेक्षा जास्त पीटीआर (विद्यार्थी-शिक्षक प्रमाण) असणाऱ्या शाळांची टक्केवारी[१७] |
|---|---|---|
| प्राथमिक (१ ते ४) | १६ | ७.२६% |
| उच्च प्राथमिक (५ ते ७) | २८ | ३२.८४% |
| माध्यमिक (८ ते १०) | २९ | ४२.५२% |

तक्ता : विद्यार्थी व शिक्षक यांचे प्रमाण, खेड तालुका
स्रोत : U DIES, २०१८-१९

१६ आम्हाला माहिती देणाऱ्या महत्त्वाच्या व्यक्तींशी केलेल्या चर्चेनुसार खेडसंदर्भात कठीण म्हणून वर्गीकरण करण्यात आलेली ठिकाणे म्हणजे दुर्गम आदिवासी भागातल्या शाळा आहेत.

१७. मुलांचा शिक्षणाचा हक्क (दि राइट ऑफ चिल्ड्रेन टू फ्री अँड कंपल्सरी एज्युकेशन (आरटीइ) ) कायदा, २००९ यामध्ये विद्यार्थी व शिक्षकांचे प्रमाण (पीटीआर) प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांमध्ये किती असावे ते दिलेले आहे. प्राथमिक स्तरावर पीटीआरचे प्रमाण ३०:१ आणि उच्च प्राथमिक स्तरावर ते ३५:१ असावे. राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान (आरएमएसए) आराखड्यात सांगितले आहे की माध्यमिक स्तरावर पीटीआरचे प्रमाण ३०:१ असे असावे.

पालक आणि एकूणच समाजाच्या दृष्टीने, एखाद्या शाळेची गुणवत्ता कशी आहे हे तिथल्या शिक्षकांची गुणवत्ता कशी आहे याच्याशी संबंधित असते. त्यामुळेच, समाजातील लोक आणि शिक्षक यांचे संबंध कसे आहेत यातून शिक्षकाची गुणवत्ता ठरवण्यासाठी मदत होते. परंतु, अनेक पालकांनी सांगितले की, अनेकदा शाळांमध्ये विद्यार्थ्यांना भविष्यातील संधींबद्दल किंवा जीवनकौशल्ये शिक्षणाबद्दल (लाइफ स्किल्स एज्युकेशन) मार्गदर्शन केले जात नाही. शिवाय, काही उत्तरदात्यांनी या मुद्याचाही विशेष उल्लेख केला की खेडमधील परिस्थितीचा विचार केला असता, शिक्षकांची मानसिकता बदलण्याची गरज आहे आणि त्यांनी त्यांच्या वर्गातील प्रत्येक विद्यार्थ्याला समजून घेण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

जिल्हा परिषद शाळांच्या कार्यपद्धतीतील काही धोरणात्मक आणि रचनात्मक घटक असे आहेत ज्यांमुळे शिक्षकांना शिकवण्याचे काम प्रभावीपणे करता येत नाही. यांपैकी काही असे आहेत:

- ज्या शाळांत केवळ एकच शिक्षक असतो तेथे शिक्षकांना विद्यार्थ्यांना मल्टी-ग्रेड मल्टी-लेव्हल (MGML)[१८] - (बहु-इयत्ता बहु-स्तरीय) शिक्षण देण्यात अडचणी येतात. जिथे दोन शिक्षक असतात अशा शाळांमध्येही एक शिक्षक प्रशासकीय कामे करत असतो त्यामुळे वर्गात शिकवण्याचे काम दुसऱ्या शिक्षकावर येते. अशा वेळी, एकाच वर्गखोलीत अनेक इयत्तांतील विद्यार्थ्यांना कसे शिक्षण द्यायचे याबद्दलचे प्रशिक्षण शिक्षकांना देण्यात आले आहे, परंतु ते किती परिणामकारक आहे याबद्दल शंका आहे.
- अनेक शिक्षणतज्ज्ञांनी (एज्युकेटर्स) आम्हाला सांगितले की जर एकाच वर्गखोलीत शिक्षकांनी प्रत्येक विद्यार्थ्याकडे लक्ष पुरवायचे असेल तर त्यांना अभ्यासक्रम ३० मिनिटांत शिकवणे कठीण जाते.
- अनेकदा, शिक्षकांनी असे मत प्रकट केले की त्यांना जी प्रशासकीय कामे करावी लागत होती त्यामुळे त्यांना वर्गात जाऊन शिकवायला वेळ कमी मिळत होता.
- खेडमधील आदिवासी भागात असे दिसून आले, की विद्यार्थी आणि शिक्षक यांची पार्श्वभूमी वेगळी असेल तर आदिवासी व स्थलांतरीत कुटुंबातील विद्यार्थ्यांना शाळेतील अभ्यासात रस वाटत नाही. कारण अभ्यासक्रमाची आणि शिक्षकांची शिकवण्याची पद्धत विद्यार्थ्यांच्या पार्श्वभूमीचा विचार करून ठरवलेली नाही.

खेडमधील शिक्षकांनी असेही सांगितले की शिक्षकांसाठी सहाय्य करणाऱ्या ज्या यंत्रणा आहेत त्यांमध्येही खूप त्रुटी आहेत. शिक्षकांच्या सांगण्यानुसार, शिक्षकांना दिले जाणारे प्रशिक्षण परिणामकारक नसते आणि अशा प्रशिक्षणामुळे शिक्षकांना शिक्षणपद्धतीतील आवश्यक तंत्रे नीट शिकून घेता येत नाहीत. अशा प्रशिक्षणांसाठी सामान्यपणे या शिक्षकांना शाळेतून बाहेर यावे लागते व एका दिवसाचे अध्यापन बुडते. शिवाय केपी (KP) - केंद्र प्रमुखांकडे शिक्षकांना शैक्षणिक पातळीवर सहाय्य करण्यासाठीचे पुरेसे कौशल्य नसते आणि जेव्हा ते वर्गाला भेट देतात तेव्हा त्यांचा भर सहाय्य करण्याऐवजी मूल्यमापन करण्याचाच असतो. प्रशासनासाठी वेगवेगळा डेटा (माहिती) गोळा करणे एवढेच त्यांचे काम उरते. काही जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (DIET) अधिकाऱ्यांशी बोलताना अशी माहिती मिळाली, की शिक्षकांसाठीची सहाय्य यंत्रणा जितकी परिणामकारक असायला हवी तितकी ती नाही. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था(DIET) सारख्या संस्थांना संसाधनांबाबत ज्या मर्यादांचा सामना करावा लागतो, त्यांचा वरील मुद्यांपैकी बऱ्याचशा मुद्यांशी थेटपणे संबंध आहे.

मुलांना शारीरिक शिक्षा करण्याविरूद्ध जे आदेश देण्यात आलेले आहेत त्याच्याशी संबंधित एक मुद्दाही आहे. अभ्यासादरम्यान असे दिसून आले की , काही प्रमाणात शिक्षणतज्ज्ञ/शिक्षक आणि पालक यांना हा आदेश फारसा आवडलेला नव्हता. जेव्हा शारीरिक शिक्षेबद्दल थेटपणे प्रश्न विचारला तेव्हा त्याचे उत्तर नाही असेच दिले गेले परंतु आमच्या उत्तरदात्यांपैकी बहुतेकांना हा आदेश योग्य वाटला नव्हता. एकूणच, अजिबात शिक्षा करायची नाही या धोरणाच्या बाबतीत शिक्षकांचे मत फारसे अनुकूल नव्हते, कारण अजिबात शिक्षा करायची नसेल तर विद्यार्थ्यांना शिस्त लावणे कठीण जाते असे त्यांचे मत होते. त्यामुळेच, शिक्षक कधीकधी शिस्तीबाबत उदासीन बनतात आणि शारीरिक शिक्षा न देता वर्गाला कसे सांभाळायचे याबद्दलचे तंत्र त्यांना अवगत नसते. काही शिक्षकांच्या आणि प्रमुख उत्तरदात्यांच्या (की रिस्पाँडंटस) मते, याच्याशीच संबंधित आणखी एक धोरण म्हणजे कोणालाही नापास करायचे नाही, ज्यामुळे पालक व विद्यार्थ्यांमध्येही बेफिकिरीची मानसिकता निर्माण झाली आहे.

---

१८ मल्टि-ग्रेड मल्टि लेव्हल (एमजीएमएल) अध्यापन म्हणजे जेथे वेगवेगळ्या वयोगटातील विद्यार्थी एकाच वर्गखोलीत असतात (मल्टिग्रेड-अनेक इयत्तांत) व त्यांचे कौशल्य एका विशिष्ट अभ्यासक्रमानुसार वेगवेगळ्या स्तरावर असते (मल्टि-लेव्हल - अनेक स्तरांत). स्रोत : म्युलर, टी. लिचटिंगर, यू. व गर्ग, आर. (२०१५). दि मल्टीग्रेड मल्टिलेव्हल मेथडॉलॉजी अँड इटस ग्लोबल सिग्निफिकन्स : लॅडर्स ऑफ लर्निंग - सायंटिफिक होरायझन्स - टीचर एज्युकेशन . वेरलॅग बार्बरा बुड्रिच.

*शिक्षकांच्या गरजा*

शिक्षकांच्या गरजांपैकी प्रमुख गरजा म्हणजे शाळेतील मूलभूत सुविधांबद्दलच्या गरजा आहेत. त्यांच्या मागण्यांपैकी सर्वात प्रमुख मागणी म्हणजे ई-शिक्षणाची सुविधा, स्मार्ट टीव्ही किंवा स्मार्ट बोर्डस. काही शाळांतील शिक्षकांनी कंपाऊंडच्या भिंतींची , अधिक चांगल्या वर्गखोल्यांची आणि स्वच्छतागृहांची (टॉयलेटस) मागणीही नमूद केली कारण त्यांच्या शाळांमध्ये या सुविधा नव्हत्या. मूलभूत सुविधांखेरीज, या शिक्षकांनी वारंवार नोंदवलेली एक गोष्ट म्हणजे पालकांकडून सहाय्य न मिळणे. विशेषत: मुलांनी घरी अभ्यास करण्याची गरज किंवा पालकांनी शाळा व्यवस्थापन समिती (SMC) मध्ये भाग घेण्याची गरज या शिक्षकांनी बोलून दाखवली. मुलांना शाळा सुटल्यानंतर घरी अभ्यास केला पाहिजे आणि त्यासाठी पालकांनी त्यांच्याकडे लक्ष दिले पाहिजे असे मत या शिक्षकांनी व्यक्त केले.

शिक्षकांनी थेटपणे व्यक्त केलेल्या गरजांखेरीज, या अहवालात सादर केलेल्या माहितीवरून असे दिसून येते की शिक्षकांना कराव्या लागणाऱ्या प्रशासकीय कामाचे ओझे, एकाच वेळी अनेक इयत्तांमधील अनेक विद्यार्थ्यांना शिकवणे आणि विविध धोरणांमुळे शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या पातळीत योग्य तो बदल घडवून आणता न येणे हे काही प्रमुख मुद्दे आहेत. यांखेरीज, आम्हाला असेही दिसून आले की शिक्षकांना जे प्रशिक्षण दिले जाते ते पुरेसे नसते आणि विशिष्ट विषय शिकवण्याच्या पद्धतीबद्दलचे आणि वर्गाचे व्यवस्थापन कसे करायचे याबद्दलचे पुरेसे ज्ञान त्याच्याकडे नसते. परंतु यांपैकी कोणतीही गोष्ट प्रत्यक्ष शिक्षकांनी आपली गरज म्हणून व्यक्त केली नाही. शिक्षकांच्या गरजा आणि आम्हाला जाणवलेले मुद्दे यांचा जर एकत्रितपणे विचार केला तर असे दिसते की ते एकमेकांशी जुळणारे आहेत. शिक्षकांनी मांडलेल्या मागण्यांमध्ये प्रामुख्याने शाळेतील सुविधांमध्ये सुधारणा आणि पालकांकडून अधिक सहाय्य मिळणे यांवर भर दिलेला होता, परंतु शिक्षकांना अधिक चांगल्या रीतीने शिकवता यावे यासाठी अधिक सहाय्य व प्रशिक्षण, तसेच त्यांच्या स्वत:च्या अध्यापनकौशल्यात सुधारणा होणे या गोष्टीही तितक्याच महत्त्वाच्या होत्या परंतु या अभ्यासात सहभागी झालेल्या शिक्षकांनी कोणत्या गोष्टींची गरज आहे हे सांगताना या मुद्यांचा उल्लेख केला नाही.

# समाजाशी संबंधित मुद्दे व गरजा

असे दिसून आले की सर्वच ठिकाणच्या पालकांची आपल्या मुलांना शाळेत पाठवायची मनापासून इच्छा होती, मग ते मूल मुलगा असो किंवा मुलगी. खेडमधील अनेक व्यक्तींशी बोलताना असे आढळले की जे पालक सुशिक्षित होते ते मुलांच्या दररोजच्या शिक्षणासाठी सहाय्य करण्याची शक्यता जास्त होती, परंतु एकूणच पालकांना आपल्या मुलांना घरी अभ्यासात मदत करणे कठीण जात होते असे दिसले. ग्रामीण भागात उपचारात्मक शिक्षण (रेमेडियल एज्युकेशन) मिळण्याच्या संधीच उपलब्ध नाहीत आणि शहरी भागात अशा संधी असल्या तरी त्या फार खर्चिक असल्यामुळे विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी मुख्यत: त्यांच्या शिक्षकांवरच आणि शाळेतील मर्यादित सुविधांवरच अवलंबून राहावे लागते.

ज्या पालकांना आपल्या मुलांना घरी अभ्यासासाठी सहाय्य करणे शक्य नव्हते त्याचे कारण म्हणजे त्यांचे स्वत:चे शिक्षण कमी असणे आणि/किंवा त्यांना कामानिमित्त खूप वेळ घराबाहेर राहावे लागणे हे होते. एमआयडीसीमधील / शहरी भागातील लोकांनी ग्रामीण भागातील पालकांच्या तुलनेत, त्यांच्या मुलांच्या शिक्षणामध्ये स्वत: सहाय्य करण्याबाबत अधिक सकारात्मक प्रतिसाद दिला. ग्रामीण भागातील घरांमध्ये पालकांना शेतीच्या कामांत किंवा मजुरीच्या कामासाठी जावे लागल्यामुळे त्यांच्या मुलांच्या अभ्यासासाठी सहाय्य करणे त्यांना शक्य होत नव्हते.

घरातील वातावरणाशी संबंधित आणखी एक मुद्दा म्हणजे विद्यार्थ्यांना करावी लागणारी घरातील कामे. असे दिसून आले की कधीकधी विद्यार्थ्यांना घरातील कामे करावी लागल्यामुळे ते शाळेत येत नाहीत, उदा. पाणी आणणे, जनावरांची देखभाल आणि घरातील इतर कामे. शिवाय, २७% विद्यार्थ्यांनी सांगितले की त्यांना घरी अभ्यासासाठी पुरेसा वेळ मिळत नाही. ३१% विद्यार्थ्यांनी सांगितले की घरातली कामे सांभाळून अभ्यास करणे कठीण जाते. हे विशेषत: मुलींच्या बाबतीत जास्त खरे होते, परंतु मुलग्याच्याही अभ्यासावर याचा परिणाम होतो.

शिवाय, ठाकर (एसटी) (अनुसूचित जमाती) समाजात हे विशेष करून दिसून आले. क्वालिटेटिव्ह इंटरव्ह्यू (सविस्तर मुलाखत) मधील माहितीनुसार, याचे कारण असे असू शकेल की एसटी (अनुसूचित जमाती) मधील विद्यार्थी मुख्यत: कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांतील असतात, आणि या कुटुंबातील लोकांना शेतमजुरीची कामे किंवा बांधकामाच्या ठिकाणी मजूर म्हणून काम करावे लागते किंवा शेळ्या/मेंढ्या पाळणे यावरच त्यांची उपजीविका चालते.

असेही दिसून आले की विद्यार्थ्यांच्या भावनिक गरजा कधीकधी घरी पूर्ण होत नाहीत. एकतर पालकांचे त्यांच्याकडे नीट लक्ष नसते किंवा कामावर जायला लागल्यामुळे पालकांना वेळ देता येत नाही. एका उत्तरदात्याने सांगितल्यानुसार, कधीकधी विद्यार्थ्यांनी एकटेपणाची भावना जाणवल्याचे व असहाय्य वाटल्याचेही नमूद केले आहे. शिक्षणतज्ज्ञांच्या (एज्युकेटर्स) मतेदेखील खेडमधील विद्यार्थ्यांत मानसिक ताणतणावाचे हे एक कारण आहे. अशा वेळी, शाळांनी पुढे येऊन विद्यार्थ्यांना मानसिक आधार दिला पाहिजे परंतु तसे नसेल तर त्याचाच परिणाम विद्यार्थ्यांनी शाळा सोडण्यात होऊ शकतो.

### *पालकांच्या गरजा*

विद्यार्थ्यांप्रमाणेच, पालकांनीही उच्च शिक्षण घेण्यासाठी वाहतुकीच्या पुरेशा सुविधांची गरज बोलून दाखवली, तसेच स्वच्छ टॉयलेटस, खेळांच्या सुविधांमध्ये सुधारणा आणि ग्रथांलयामधील सुविधांमध्ये सुधारणा होणे आवश्यक आहे असे सांगितले. काही पालकांनी सांगितले की विद्यार्थ्यांना उपचारात्म क शिक्षण (रेमेडियल एज्युकेशन) कमी खर्चात मिळाले पाहिजे आणि इतर काही पालकांची मागणी होती की काही विशिष्ट विषयांसाठी पुरेसे शिक्षक असले पाहिजेत. उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांची गरजही त्यांनी बोलून दाखवली. या सर्वांचा त्यांच्या मुलांना अधिक चांगले शिक्षण मिळण्याशी संबंध होता. त्यांनी ज्या गरजा थेटपणे बोलून दाखवल्या त्या मुख्यत: प्रत्यक्ष स्त्रोतांशी संबंधित होत्या आणि काहींनी शिकवण्याचा दर्जा आणि शिकण्याच्या पद्धती यांमध्येही सुधारणा होण्याची गरज बोलून दाखवली.

# शिक्षणाचा गुणवत्ता

विद्यार्थ्यांना काय व किती समजले आहे याचा विचार करायचा झाल्यास, २०१८-१९ च्या अध्ययन स्तर निश्चिती[१९] मधील माहितीनुसार इतर तालुक्यांच्या तुलनेत खेड तालुक्यातील शिक्षणाचा दर्जा/गुणवत्ता मध्यम ते उच्च या स्तरावर आहे. आपल्याला असे दिसते की खेडमधील ७८% विद्यार्थी समजून घेऊन वाचन करू शकतात तर इयत्ता ४थी व ५ वी मधील ७७% विद्यार्थ्यांना भागाकार करता येतो, हे प्रमाण संपूर्ण जिल्ह्यात सर्वात जास्त आहे. परंतु, खेडमधील शिक्षणाचा दर्जा/गुणवत्ता यांबद्दलचा दृष्टीकोन मर्यादितच असल्याचे दिसून आले, कारण शिक्षणाच्या दर्जा/गुणवत्तेबद्दलची चर्चा प्रामुख्याने मूलभूत सुविधा आहेत की नाहीत यांवर किंवा विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत व राज्यस्तरीय परीक्षांमध्ये काय कामगिरी केली यावरच केंद्रित होत्या. खेडमधील उपचारात्मक शिक्षणाच्या (रेमेडियल एज्युकेशन) च्या बाबतीत, आपल्याला असे दिसून येते की थोड्या फार प्रमाणात ही सुविधा उपलब्ध असली तरी ग्रामीण व आदिवासी भागात त्याचे प्रमाण मर्यादितच होते.

परीक्षांखेरीज, अभ्यासक्रम कसा आहे याचा थेट संबंध शिक्षणाच्या दर्जा/गुणवत्तेशी असतो कारण अभ्यासक्रमाची रचना सर्वांचा समावेश होईल अशा रीतीने केलेली नसते आणि विद्यार्थ्यांनी, विशेषत: आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांनी, यापूर्वी काय शिकलेले आहे त्याचा विचार केल्याचे दिसून येत नाही. आम्ही जेव्हा खेडमधील वेगवेगळ्या प्रमुख घटकांशी (विद्यार्थ्यांच्या शिक्षणाशी संबंधित विविध व्यक्तींशी) बोललो तेव्हा त्यांनी विद्यार्थ्यांना येण्याजाण्यासाठीच्या सुविधांमध्ये सुधारणा, टॉयलेटसची संख्या पुरेशी असणे, कॉंप्युटर्स नीट चालू स्थितीत असणे, ई -शिक्षणाच्या सुविधा असणे, खेळ व वाचनालयाच्या सुविधा असणे आणि रेमेडियल एज्युकेशनच्या सुविधा उपलब्ध असणे यांवरच त्यांनी भर दिलेला आढळून आला.

१९ अध्ययन स्तर निश्चिति जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, पुणे (DIET) यांनी जिल्हा परिषद शाळांसाठी केलेला एक मूल्यमापन कार्यक्रम आहे. यात महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांची मराठी, इंग्रजी व उर्दू माध्यमातील विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या पातळ्यांचे मूल्यमापन केले आहे. हे मूल्यमापन इयत्ता २ ते ५ मधील विद्यार्थ्यांसाठी केले जाते व त्यात भाषेचे ज्ञान आणि गणितातील अध्ययन निष्पत्ती तपासले जाते.

# एनजीओ सीएसआर यांचे कार्य

खेडमधील एनजीओंचे (NGO - स्वयंसेवी संस्थांचे) काम एमआयडीसी/शहरी भागांच्या जवळ असलेल्या भागात खूप जास्त प्रमाणात चाललेले आढळून आले. त्या तुलनेत तालुक्यातील दूरवरच्या भागांत, विशेषत: आदिवासी आणि ग्रामीण भागात , जे भाग शहरांपासून (सेन्सस टाऊन्स) पासून दूर होते अशा ठिकाणी एनजीओंचे काम कमी प्रमाणात दिसून आले. उदाहरणार्थ, आदिवासी भागात फक्त १३% पालकांनी त्यांच्या मुलाच्या शाळेत एखाद्या एनजीओचे काम चालत असल्याचे नमूद केले तर एकूण याचे प्रमाण २०% इतके होते. परंतु, शाळेतील शिक्षक आणि मुख्याध्यापक यांना याबद्दल जास्त जागरूकता असलेली दिसली. या तालुक्यातील शिक्षक आणि मुख्याध्यापकांना सीएसआर (CSR) द्वारे आपल्याला मदत मिळू शकते याबद्दल नीट माहिती होती व ते सीएसआर सहाय्य मिळवण्याचा प्रयत्नही करीत होते.

ज्यांना सीएसआर-एनजीओ सहाय्य प्रत्यक्ष मिळत होते अशा लाभार्थींनीही असे सांगितले की एनजीओंमुळे मदत होते आहे, परंतु कोणताही सहाय्यक उपक्रम सुरू करण्यापूर्वी सीएसआर-एनजीओंनी त्या शाळेची गरज नेमकी काय आहे हे समजून घेतले पाहिजे. त्यांनी असेही सांगितले की सीएसआरचे कार्यक्रम विशिष्ट रचना असलेले होते आणि त्यामुळे शाळेच्या गरजा त्यांना पुरेशा प्रमाणात पूर्ण करता येत नव्हत्या. या शाळांमध्ये दीर्घकालीन कार्यक्रमांची संख्या खूपच कमी होती आणि मूलभूत सुविधा पुरवण्यासाठी एकदाच देणगी देणे अशा प्रकारेच सामान्यत: सहाय्य दिले जात होते. शहरांपासून (सेन्सस टाऊन्स) दूर असलेल्या ठिकाणी हे विशेषत: जास्त प्रमाणात दिसून आले.

# शिफारशी

| विषय | खेडमधील शाळांच्या बाबतीतील महत्त्वाचे मुद्दे | सीएसआरसाठी उपायपद्धती/ शिफारशी |
|---|---|---|
| उपलब्धता (शिक्षणाची उपलब्धता) | खेडमध्ये विद्यार्थ्यांना शाळेत पोचण्यासाठी विश्वासार्ह सार्वजनिक वाहतूक सेवा / कमी खर्चातील वाहतूक सेवा उपलब्ध नाही. सार्वजनिक वाहतूक सेवा वापरताना ते विद्यार्थ्यांसाठी, विशेषत: मुलींसाठी सुरक्षित नसल्याचे येथील लोकांना वाटते. | स्थानिक सरकारी संस्थांबरोबर (ग्रामपंचायत) ५-१० वर्षांचा करार करून विद्यार्थ्यांसाठी आणि ग्रामस्थांसाठी शटल सर्विस सुरू करणे. या शटल सेवा तेथील समाजातीलच एक किंवा जास्त महिलांद्वारे चालवल्या जाऊ शकतात. एमएसआरटीसी (ST )/पीएमपीएमएल यांनाही जिथे शक्य असेल तेथे यात सामावून घेता येईल. |
| | माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षणाचा खर्च (इयत्ता ८ वी पासून पुढे) जास्त आहे कारण मोफत शिक्षण देणाऱ्या संस्था जवळजवळ नाहीतच. | या तालुक्यातील ज्या मुलांना उच्च शिक्षण (हायस्कूल व कॉलेज) घ्यायचे आहे त्यांच्यासाठी सर्वांचा समावेश करून घेणारी आणि गरजेवर आधारीत (आर्थिक) शिष्यवृत्ती योजना. |
| मूलभूत सुविधा | १७% शाळांना मोठ्या प्रमाणात दुरूस्ती करून घेण्याची गरज आहे आणि १०% शाळांना त्यांच्याकडील एकूण मूलभूत सुविधांमध्ये किरकोळ दुरूस्तीची गरज आहे. | शाळा किती जवळ आहे यानुसार शाळेचे नूतीकरण करण्यासाठी निवड न करता, शाळेच्या प्रमुखा नुसार गरजा नोंदवून सीएसआरखाली मूलभूत सुविधांबद्दल-चे कार्यक्रम अधिक पारदर्शकणे सांगणारी यंत्रणा (टेक प्लॅटफॉर्म) वापरणे. उदा. नाशिक जिल्हा परिषद वा-परत असलेली 'सर्वसूत्र प्रणाली'. |
| | शाळांमध्ये विजेचे कनेक्शन नसते कारण शाळेकडे विजेचे बिल भरण्यासाठी बजेटमध्ये तरतूद केलेली नसते. शिवाय, जेथे शाळांमध्ये विजेचे कनेक्शन असते ते बेभरवशाचे असते. | शाळांसाठी सोलर (सौरउर्जा), पवनउर्जा किंवा स्थानिक प्रदेशानुसार वापरण्यास योग्य असलेले वीजनिर्मितीच्या पद्धतींचा वापर करावा, ज्यासाठी ३-५ वर्षांपर्यंत मेंटेनन्स सपोर्ट (देखभालीसाठी सहाय्य) असावा. |

| विषय | खेडमधील शाळांच्या बाबतीतील महत्त्वाचे मुद्दे | सीएसआरसाठी उपायपद्धती/ शिफारशी |
|---|---|---|
| मूलभूत सुविधा | बहुतेक सर्व शाळांमध्ये स्वच्छ टॉयलेटसचा अभाव आहे. ही टॉयलेटस वापरली न जाण्याचे व अस्वच्छ असण्याचे मुख्य कारण म्हणजे पाणी अगदीच कमी प्रमाणात उपलब्ध असते किंवा अजिबातच नसते. इतर ठिकाणी टॉयलेटसची संख्या पुरेशी नसते. | एक सर्वसामान्य नियम म्हणून, सर्व टॉयलेटस आणि स्वच्छतेशी संबंधित इतर सर्व सुविधा रेन वॉटर हार्वेस्टिंग (पर्जन्य जल संधारण) पद्धतींशी जोडल्या जाव्यात म्हणजे पाणी उपलब्ध होईल, विशेषत: दुर्गम भागात याचा उपयोग होईल.<br><br>यानंतरच्या काळात, टॉयलेटस बांधताना ती वॉटर-फ्री (पाण्याच्या उपयोगाशिवाय)/ ऑटो-क्लीन (आपोआप स्वच्छ होणारी) असावीत. |
| | तालुक्यात बहुतेक शाळांमध्ये ग्रंथालय चालू नाहीत त्यामुळे विद्यार्थ्यांना वाचण्यासाठी पुस्तके उपलब्ध नाहीत. | एक केंद्रभूत, क्लस्टर आधारीत पुस्तक-देणगी व बदलण्यासंबंधीचा कार्यक्रम सुरू करता येईल, ज्यामुळे अनेक खेड्यांतील विद्यार्थ्यांना वाचण्यासाठी साहित्य मिळू शकेल.<br><br>ज्या एनजीओ वाचनासंबंधी आणि मुलांना वाचायला साहित्य देण्यासंबंधी काम करतात अशा एनजीओंबरोबर संबंध निर्माण करणे.<br><br>मोफत ऑनलाइन शिक्षणाच्या पद्धतींबद्दल जागरूकता निर्माण करून ई -बुक्स आणि डिजिटल शिक्षणाच्या पद्धती यांसारख्या पर्यायांबद्दल विचार करणे. |
| | जवळजवळ सर्वच शाळांमध्ये शारीरिक शिक्षण नीट दिले जात नाही.<br><br>काही शाळांमध्ये पटांगण नाही, तर जवळजवळ सर्वच शाळांमध्ये खेळाची साधने नाहीत. | ज्या एनजीओ खेळांतून जीवन कौशल्यांबद्दलचे (लाइफ स्किल्स एज्यकेशन बद्दल) काम करतात, त्यांच्याबरोबर काम करणे. उदा. मॅजिकबस, जस्टफॉरकिक्स इ. |

| विषय | खेडमधील शाळांच्या बाबतीतील महत्त्वाचे मुद्दे | सीएसआरसाठी उपायपद्धती/ शिफारशी |
|---|---|---|
| मूलभूत सुविधा | ४०२ जिल्हा परिषद शाळांपैकी फक्त २५ शाळांमध्ये कॉंप्युटर लॅब आहे आणि १८५ शाळांमध्ये ई -शिक्षणाची किटस आहेत. जिल्हा परिषद शाळांमध्ये तंत्रज्ञानाची उपलब्धता नाही, ३०% जि.प. शाळांमध्ये चालू स्थितीतील एकही कॉंप्युटर नाही.<br><br>आदिवासी भागांमध्ये इंटरनेट कनेक्टिविटी ही मोठीच समस्या आहे. | डिजिटल साक्षरतेबद्दलचा आराखडा तयार करणे, ज्यात विविध पातळ्या निश्चितपणे ठरवलेल्या असतील आणि विशिष्ट कालमर्यादेत शाळांना सर्वात वरच्या स्तरापर्यंत नेण्यासाठी कार्यक्रम तयार करून तो राबवणे. |
| गुणवत्ता/ दर्जा | खेड तालुक्यातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक कार्य याच जिल्ह्यातील इतर भागातील विद्यार्थ्यांच्या तुलनेत मध्यम ते उच्च प्रमाणात आहे | ज्या एनजीओ (स्वयंसेवी संस्था) सोशल इमोशनल लर्निंग आणि २१ व्या शतकासाठी आवश्यक कौशल्ये लक्षात घेऊन सर्वांगीण पद्धतीचे सहाय्यक उपक्रम तयार करीत असतील अशा एनजीओंबरोबर काम करणे.<br><br>स्थानिक प्रदेशातील संदर्भ लक्षात घेऊन तयार केलेली शिक्षक पुस्तिका आणि व्हिडीओ क्लस्टर मीटिंग्ज आणि प्रशिक्षणांमधून सर्वांपर्यंत पोचवावीत, ज्यांतून शिक्षकांना स्थानिक प्रदेशातील माहितीचा उपयोग करून शिकवणे शक्य होईल.<br><br>ज्या सहाय्यक उपक्रमांतून समाजातील लोकांना आणि विद्यार्थ्यांना शाळेतील गुणवत्तेबद्दल शाळेला जबाबदार धरण्यासाठी मदत होईल अशा उपक्रमांची गरज आहे. गट संसाधन केंद्रांचे (क्लस्टर रिसोर्स सेंटर्सचे) अद्ययावतीकरण करणे आवश्यक आहे, म्हणजे तेथे स्थानिक स्रोत उपलब्ध होऊ शकतील आणि सर्व शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी योग्य वातावरण निर्माण होऊ शकेल.<br><br>प्रशिक्षण केंद्रे जागतिक दर्जाची व्हावीत यासाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेस (DIET) ला पुरेसे आणि गरजेनुसार अनुदान आणि संसाधने उपलब्ध करून देणे |
| | पालक आणि प्रमुख उत्तरदाते (की रिस्पॉंडंटस) यांनी सांगितले आहे की वर्गात ज्या प्रकारे शिकवले जाते ते तेथील प्रादेशिक स्थितीशी सुसंगत नसते, हे विशेषत: आदिवासी भागांमध्ये दिसून येते. | |
| | जवळजवळ सर्वच शाळांमध्ये शारीरिक शिक्षा दिली जाते आणि शिक्षकांना व पालकांना वाटते मुलांना शिस्त लागण्यासाठी शारीरिक शिक्षा देणे आवश्यक आहे. | |

| विषय | खेडमधील शाळांच्या बाबतीतील महत्त्वाचे मुद्दे | सीएसआरसाठी उपायपद्धती/ शिफारशी |
|---|---|---|
| आजूबाजूच्या वातावरणाशी संबंधित मुद्दे | काही विद्यार्थ्यांच्या बाबतीत उपचारात्मक शैक्षणिक पद्धतींचा (रेमेडियल सपोर्टचा) अभाव आहे. शिवाय अनेक मुलांना, विशेषत: आदिवासी भागातील व स्थलांतरीत कुटुंबांतील मुलांना घरात भावनिक आधार मिळत नाही.<br><br>बहुतेक सर्व खेड्यांमध्ये प्राथमिक आरोग्य सुविधाही उपलब्ध नाहीत. बहुतेक खेड्यांमधील प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये डॉक्टर नसतात आणि जवळपासच्या खेड्यात जाण्यासाठी चांगली वाहतुकीची सेवा नसते. | सीएसआर-एनजीओ सेल (कक्ष) तयार करणे, जेथे आरोग्य व शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या एनजीओंना एकमेकांकडून शिकता येईल आणि ते ज्यांच्यासाठी काम करीत आहेत त्या समाजातील समस्यांवर उपाय शोधण्यासाठी त्यांना एकत्रितपणे काम करता येईल.<br><br>ज्या एनजीओ स्कूल रेडीनेस प्रोग्राम्स (शाळापूर्व तयारी) राबवतात आणि अंगणवाड्यांतील शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी काम करतात अशा एनजीओंबरोबर काम करणे<br><br>पंचायतींबरोबर काम करून जागरूकता कार्यक्रमांसाठीचे प्रायोजकत्व घेणे, ज्यामुळे केवळ कुटुंबांकडूनच नव्हे तर संपूर्ण समाजाकडून मुलांना सहाय्य मिळेल याबद्दल खात्री करून घेता येईल, ज्यामुळे मुलांच्या शिक्षणासाठी शाळेबाहेरदेखील योग्य वातावरण निर्माण होईल. गावपातळीवर मासिक शिक्षक आणि ग्रामसेवक तथा शिक्षण समिती यांची बैठक होणे गरजेचे आहे. शिक्षण हा ग्रामसभा यांमधील महत्वपूर्ण मुद्दा असणे गरजेचे आहे. |

## *आदिवासी भागातील सहाय्यक उपक्रमांचा प्राधान्यक्रम ठरवणे*

असे नेहमीच सांगितले जाते की सरकारच्या तुलनेत सीएसआर उपक्रमांकडे मर्यादित प्रमाणात स्त्रोत उपलब्ध असतात. त्यामुळेच, जास्तीत जास्त परिणाम साधण्यासाठी,या मर्यादित स्त्रोतांचा उपयोग अशा लोकांना सक्षम करण्यासाठी केला पाहिजे ज्यांना त्याची सर्वात जास्त गरज आहे. त्यामुळेच, आमच्या रिसर्च टीमच्या अनुभवांवर आधारीत आम्ही एक शिफारस प्रामुख्याने करू इच्छितो, की आदिवासी भागांमध्ये वर नमूद केल्यानुसार उपक्रमांची सुरूवात करण्याकडे लक्ष केंद्रित करावे. या भागातील मुलांना शाळेतील शिक्षणाच्या उपलब्धतेबद्दलच्या समस्या सर्वात जास्त असतात आणि या भागातील मुले शाळा सोडून देण्याचे प्रमाण सर्वात जास्त असते आणि या भागातील लोकांना अशा उपक्रमांची गरज सर्वात जास्त असली तरीदेखील प्रत्यक्ष या भागात काम करणाऱ्या एनजीओंची संख्या अगदीच कमी किंवा शून्य इतकीच आहे.

## *प्राथमिक ते माध्यमिक ते उच्च शिक्षणामधील तफावतीकडे प्राधान्याने लक्ष देणे*

आजच्या आर्थिक परिस्थितीतील वाढलेल्या मागण्या आणि अत्यंत स्पर्धात्मक स्थितीतील जॉब मार्केटमुळे, ज्या भागांमध्ये पुरेशा सुविधा पुरवल्या जात नाही आहेत तेथील लोकांचे जीवनमान सुधारण्यासाठी केवळ प्राथमिक शिक्षण पुरेसे होणार नाही. सध्या, पालकांची मुलांना उच्च शिक्षणासाठी पाठवण्याची तयारी आहे परंतु आर्थिक अडचणींमुळे आणि शिक्षण संस्थांपर्यंत पोचण्यात अनेक अडचणी असल्यामुळे एकीकडे मोफत शिक्षण देणाऱ्या प्राथमिक शाळा आहेत तर दुसरीकडे शुल्क आकारणाऱ्या माध्यमिक आणि उच्च शिक्षण देणाऱ्या संस्था अशी तफावत दिसून येते. ही तफावत दूर करण्यासाठी काही नाविन्यपूर्ण पद्धती शोधून काढून त्यासंबंधीचे उपक्रम राबवणाऱ्या संस्थांबरोबर काम करण्याला प्राधान्य दिले पाहिजे.

## *प्रत्येक उपायपद्धती टिकून राहण्यासाठी पद्धतशीर नियोजनाची आवश्यकता*

जर सहाय्यक उपक्रमांची रचना काही विशिष्ट समस्यांसाठी केली गेली तर असे उपक्रम काही काळपर्यंत चांगले काम करतात, परंतु दीर्घकाळपर्यंत त्यांचे काम चालू राहू शकत नाही, याबद्दल वारंवार नमूद केले गेलेले आहे. अभ्यासातून लक्षात आलेला आणखी एक मुद्दा म्हणजे, ज्या कुटुंबांना पुरेशा सुविधा उपलब्ध नाहीत, त्या कुटुंबातील मुलांचे शैक्षणिक काम कमी दर्जाचे होण्यामागे यातील केवळ एकच नव्हे तर अनेक मुद्यांचा एकत्रितपणे परिणाम झालेला दिसतो. त्यामुळेच, सर्वात महत्त्वाची शिफारस अशी आहे की सीएसआर (CSR) उपक्रमांमध्ये या सर्वच मुद्यांचा एकत्रितपणे विचार केला जाऊन, काही विशिष्ट उपक्रम तयार करण्यात यावेत, त्यासाठी सर्वांच्या स्रोतांचे एकत्रीकरण करावे व एकेकट्या मुद्यासाठी उपक्रम तयार न करता सर्वांगीण पद्धतीने यावर उपाययोजना करण्यात यावी. असे केल्यास खालील गोष्टी शक्य होतील:

- खेडमधील सीएसआर, एनजीओ, सरकारी प्रतिनिधी, राजकीय प्रतिनिधी आणि समाजातील लोक या सर्वांनी एकत्र येऊन जागरूकता पसरवण्यासाठी आणि महत्त्वाचे मुद्दे सर्वांनीच नीट समजून घेण्यासाठी एक शैक्षणिक व्यासपीठ (एज्युकेशन राऊंडटेबल) तयार करावे. शिवाय, ज्यांना यासाठी सहाय्य करण्याची इच्छा आहे अशा व्यक्ती/संस्थांकडून आर्थिक सहाय्य मिळवण्याकडेही लक्ष पुरवावे.
- खेड तालुका पातळीवर सीएसआर-सरकार यांचा संयुक्त उपक्रम तयार करून दीर्घकालीन संयुक्त उपक्रमांबाबतचे धोरण तयार करावे, ज्यात दोन्ही बाजूंकडील नोडल ऑफिसर्स नेमून, निर्णयांची अंमलबजावणी नियोजित वेळेनुसार होत आहे की नाही याकडे लक्ष द्यावे.
- एकेकट्या कंपन्यांच्या कामाच्या ठिकाणांपासून जवळ असलेल्या भागांमध्ये काही विशिष्ट उपक्रम राबवण्याऐवजी संपूर्ण खेड तालुक्याचा एकत्रितपणे विचार करण्यासाठी एक संयुक्त धोरण तयार करावे.

# संदर्भ:

Banerji, R. (2015). How do systems respond to disruptive pedagogic innovations? The case of Pratham in Bihar. RISE Working Paper 15/02.
Bhagavatheeswaran, L., Nair, S., Stone, H., Isac, S., Hiremaths, T., Vadde, K., ... & Schweisfurth, M. (2016).The barriers and enablers to education among scheduled caste and scheduled tribe adolescent girls in northern Karnataka, South India: A qualitative study. International journal of educational development.
Das, A. K., Kuyini, A. B., & Desai, I. P. (2013). Inclusive Education in India: Are the Teachers Prepared?. International Journal of Special Education, 28(1), 27-36.
Deb, S., Kumar, A., Holden, G. W., & Simpson Rowe, L. (2017). School corporal punishment, family tension, and students' internalizing problems: Evidence from India. School psychology international, 38(1), 60-77.
Dreze, J., & Kingdon, G. G. (1999). School Participation in Rural India, The Development Economics Discussion Paper Series, No. 18. London: London School of Economics..
Dreze, J., & Kingdon, G. G. (2001). School participation in rural India. Review of Development Economics, 5(1), 1-24.
Kalyanpur, M. (2008). The paradox of majority underrepresentation in special education in India: Constructions of difference in a developing country. The Journal of Special Education, 42(1), 55-64.
Maitra, P., & Sharma, A. (2009, November). Parents and children: Education across generations in India. In 5th annual conference on economic growth and development, ISI Delhi, Delhi.
Ramachandran, V., Jandhyala, K., Mehrotra, N., Krishnamurty, L., Periodi, V., & Saihjee, A. (2004). Snakes and ladders: Factors influencing successful primary school completion for children in poverty contexts.
Ramachandran, V. (Ed.). (2004). Gender and social equity in primary education: Hierarchies of access. SAGE Publications India.
Ramachandran, V., Bhattacharjea, S., & Sheshagiri, K. M. (2008). Primary school teachers: The twists and turns of everyday practice. Education Resource Unit, New Delhi and Azim Premji Foundation, Bengaluru.
Reddy, Y. M., & Andrade, H. (2010). A review of rubric use in higher education. Assessment & evaluation in higher education, 35(4), 435-448.
Sengupta, P., & Guha, J. (2002). enrolment, drop-out and grade completion of girl children in West Bengal. Economic and Political Weekly, 1621-1637.
Sujatha, K. (2002). Education among scheduled tribes. India Education Report: A Profile of Basic Education, New Delhi: OUP.
Tilak, J. B. (1996). How free is' free' primary education in India?.Economic and Political weekly, 355-366.
Wankhede, G. G. (2001). Educational inequalities among scheduled castes in Maharashtra. Economic and political weekly, 1553-1558.
Weiner, M. (1996). Child labour in India: putting compulsory primary education on the political agenda. Economic and Political Weekly, 3007-3014.
Xaxa, V. (2001). Protective discrimination: Why scheduled tribes lag behind scheduled castes. Economic and Political weekly, 2765-2772.

# परिशिष्ट १:
# काही महत्त्वाच्या संकल्पना

या अभ्यासाची सुरूवात करण्यासाठी उपलब्ध साहित्याचे अवलोकन करण्यात आले आणि या भागातील शिक्षणाच्या उपलब्धतेवर आणि शिक्षणाच्या दर्जावर/गुणवत्तेवर परिणाम करणारे निरनिराळे घटक निश्चित करण्यात आले. या समस्या सगळीकडेच दिसून येतात असे नाही, परंतु या अभ्यासांमधील काही विशिष्ट नमुन्यांमुळे आम्हाला या अभ्यासासाठीचा मार्गदर्शक आराखडा तसेच आमची स्वत:ची मूल्यांकनाची साधने (इव्हॅल्यूएशन टूल्स) तयार करण्यासाठी मदत झाली. साहित्याच्या परिक्षणात आम्हाला पुढील संकल्पना/मुद्दे दिसून आल्या :

१. शिक्षणाचा खर्च – कमी उत्पन्न गटातील कुटुंबांच्या बाबतीत शिक्षणाचा खर्च या घटकाचा विचार करावा लागतो आणि त्या कुटुंबातील मुलांच्या शिक्षणावर त्याचा परिणाम होत असतो. जर पुरेसे पैसे उपलब्ध नसतील तर त्या कुटुंबाला आर्थिक हातभार लावण्यासाठी बालकांना बालकामगार म्हणून काम करावे लागण्याची शक्यता असते. ज्या लोकांना आर्थिक सहाय्य उपलब्ध नाही त्यांनी, ज्यांना असे आर्थिक सहाय्य उपलब्ध आहे अशा लोकांच्या तुलनेत त्यांच्या मुलांना शाळांमधून लवकर काढून घेतले, असे दिसून आले आहे. (जॅकोबी, १९९४; जॅकोबी अँड स्कोऊफियस, १९९७; दहेजा अँड गती, २००२ – बीगल इ. मध्ये नमूद केल्यानुसार, २००२ रेड्डी इ. मध्ये नमूद केल्यानुसार, २०१०). शिवाय, सरकारी शाळांमध्येही, अनेकदा शिक्षक शाळांसाठी आर्थिक सहाय्य मिळवण्यासाठी सरकारवर दबाव आणण्याऐवजी पालकांवर आणि विद्यार्थ्यांवर दबाव आणताना दिसतात. (रेडी व इतर, २०१०)

२. मुलींचे शिक्षण : घरातील सर्वात मोठ्या मुलीला नेहमीच आर्थिक जबाबदाऱ्या आणि घरातील कामांच्या जबाबदाऱ्या स्वीकाराव्या लागतात आणि मुलींनी वयात आल्यानंतर शाळेतील शिक्षण सुरू ठेवावे यासाठी शाळेतील वातावरणही फारसे अनुकूल नसते. (रामचंद्रन २००८, भगवतीश्वरन इ. २०१६)

३. घर ते शाळा यांमधील अंतर : विद्यार्थ्याच्या घरापासून शाळा किती जवळ आहे याचा विद्यार्थी प्राथमिक शिक्षण पूर्ण करेल की नाही यावर परिणाम होत असतो. रामचंद्रन (२००८) यांच्या अभ्यासानुसार, असे दिसून आले की जर शाळा घरापासून जवळ असेल तर मुलगे व मुली या दोघांच्याही बाबतीत शालेय शिक्षण पूर्ण करण्याचे प्रमाण वाढते. मुलग्यांच्या बाबतीत तर हे दिसून आलेच परंतु मुलींच्या बाबतीत हे खूपच प्रकर्षाने दिसून आले.

४. वाहतुकीची व्यवस्था – टिळक (१९९६) यांनी केलेल्या अभ्यासानुसार, शाळेत जाण्यासाठी व घरी येण्यासाठी वाहतुकीची व्यवस्था असणे हे एखादा विद्यार्थी शाळेत नियमितपणे येईल की नाही यासाठी खूपच महत्त्वाचे असते. मागील मुद्यात पाहिल्याप्रमाणे, शाळेत (वेळेत) पोचता येणे हे त्या विद्यार्थ्याचे प्राथमिक शिक्षण पूर्ण होणार की नाही यासाठी खूपच महत्त्वाचे असते.

५. सीडब्ल्यूएसएन (चिल्ड्रेन विथ स्पेशल नीडस) (विशेष गरजा असलेल्या मुलांचे शिक्षण) – ज्या मुलांच्या विशेष गरजा आहेत त्यांच्यासाठी उत्तम दर्जाचे शिक्षण आणि सेवा पुरवण्यासाठी सरकारने काही विशेष तरतुदी केलेल्या आहेत. या तरतुदी २००३ एज्युकेशन फॉर ऑल (EFA) (सर्वांसाठी शिक्षण) कार्यक्रम, शिक्षणाचा हक्क कायदा २००५ (आणि त्यानंतरचा शिक्षणाचा हक्क कायदा २००९), अपंगत्व असलेल्या मुलांच्या व तरूणांच्या शिक्षणासाठीचा कृती आराखडा (आयइसीवायडी) २००५ आणि अपंगत्व असलेल्या (दिव्यांग) व्यक्तींसाठीचे राष्ट्रीय धोरण, २००६ यांमधे समाविष्ट आहेत. अशा तरतुदी असूनही, दिव्यांग व्यक्तींच्या २००३ च्या सर्वेक्षणानुसार, ९०% पेक्षाही जास्त व्यक्तींपर्यंत या सुविधा पोचलेल्या नाहीत. यांमध्ये ६ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांचाही समावेश आहे, आणि या वयोगटातील मुलांना शिक्षणाचा हक्क कायदा २००९ लागू होतो (कल्याणपूर, २००८). शिवाय, दास व इतर (२०१३) यांच्या अभ्यासानुसार, असे दिसून आले की, शाळेतील नेहमीच्या शिक्षकांपैकी सुमारे ७०% शिक्षकांना विशेष शिक्षणाबद्दलचे प्रशिक्षण मिळालेले नव्हते किंवा त्यांना दिव्यांग विद्यार्थ्यांना शिकवण्याचा अनुभवही नव्हता.

यामुळेच, या अहवालात  दिव्यांग मुलांच्या गरजा आणि त्यांच्यासाठी केलेल्या तरतुदी या जाणून घेण्यासाठी प्रयत्न करण्यात आला.

६. बालकामगारांचे प्रमाण - या साहित्यातून असे दिसून आले की बालकामगारीमुळे शाळेत विद्यार्थी कमी प्रमाणात हजर राहतात आणि मुलींच्या बाबतीत हे जास्त दिसून येते कारण त्यांना लहान वयातच कामावर पाठवले जाते. (वीनर १९९६).

७. एससी आणि एसटी (अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती) शिक्षण - अनुसूचित प्रवर्गातील मुले शाळेत प्रवेश घेण्याची आणि शिक्षण पुढे चालू ठेवण्याची शक्यता कमी असते, तर दूरवरच्या भौगोलिक प्रदेशांमध्ये चांगल्या दर्जाचे शिक्षण उपलब्ध नसणे हे अनुसूचित जमातींतील मुलांसाठी शिक्षण न मिळण्याचे कारण दिसून आले.  सेनगुप्ता आणि गुहा (२००२) यांच्या अभ्यासानुसार, उत्तर प्रदेशमधील बिजनोर जिल्ह्यात, ग्रामीण भागातील संपन्न कुटुंबातील लोकांनी त्यांच्या मुलग्यांना शिक्षण देण्यासाठी भरपूर पैसे आणि ओळखींचा उपयोग केला होता आणि जरी दलित वर्गातील मुलांसाठी, त्यांचा सामाजिक स्तर उंचावण्यासाठी औपचारिक शिक्षणासाठीच्या संधी अधिक प्रमाणात उपलब्ध होत असल्या तरी आजपर्यंत चालत आलेली, विविध जातीजमातींमधली दरी तशीच टिकून आहे. (सेनगुप्ता व गुहा २००२). शिवाय, वानखेडे (२००१) यांच्या एका अभ्यासातून हे प्रामुख्याने दिसून आले की मागील काही दशकांमध्ये अनुसूचित जातींमधील विद्यार्थ्यांनी शिक्षण घेण्याचे प्रमाण  महाराष्ट्रात ठिकठिकाणी वेगवेगळे दिसून आले आहे. (the educational attainment of Scheduled castes has been filled with a lot of variance in Maharashtra in the previous decades). अनुसूचित जमातींमधील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या बाबतीत, जरी याबाबत वारंवार बोलण्यात आलेले असले तरीही, आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना स्थानिक संदर्भांसह शैक्षणिक अभ्यासक्रम पुरवण्याबाबत अद्यापही काहीही ठोस पावले उचलण्यात आलेली नाहीत. (सुजाता, के, २००२). आदिवासी मुलांना देण्यात येणाऱ्या शिक्षणात भूतकाळात जसे केवळ संख्येवर भर देऊन शिक्षण दिले गेले त्याऐवजी गुणवत्ता आणि समन्याय यांकडे जास्त लक्ष देण्यात आले पाहिजे. (सुजाता, के, २००२) . शिवाय, एससी आणि एसटी (अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती) यांच्यासाठी समन्यायाने वागणूक आणि अल्पसंख्यांकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठीचे प्रयत्न आवश्यक आहेत तरीही ते केले गेलेले नाहीत. (चनाना, १९९३). शिक्षणासह सर्वच बाबतीतअनुसूचित जातींच्या तुलनेत अनुसूचित जमातींची स्थिती अधिकच वाईट आहे असे दिसते (जे सकारात्मक भेदभावातील इतर लाभार्थी आहेत). (व्हर्जिनियस क्झाक्झा, २००१). अशा साहित्यामुळे, खेड तालुक्यातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीतील लोकांची स्थिती समजून घेणे आवश्यक झाले.

८.  शिक्षक उपलब्ध असणे - महाराष्ट्रातील शाळांमध्ये शिक्षक गैरहजर असण्याची समस्या गंभीर समस्या नसली तरी इतर राज्यांमध्ये ती समस्या असल्याचे दिसून आले आहे. (रामचंद्रन, २००८). त्यामुळे खेड तालुक्यातील शैक्षणिक परिस्थितीचा सर्वांगीण अभ्यास करण्यासाठी शिक्षक वर्गात उपस्थित असतात की नाही याचा अभ्यास करणे आवश्यक वाटले.

९. शारीरिक शिक्षा देणे - जर मुलाला घरी आणि शाळेत शारीरिक शिक्षेला तोंड द्यावे लागले तर त्यामुळे विद्यार्थ्याच्या मानसिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम होतो आणि ज्या विद्यार्थ्यांना कौटुंबिक ताणतणावाला तोंड द्यावे लागत होते त्यांच्या बाबतीत चिंता व नैराश्याचे प्रमाण जास्त दिसून आले. (डेब व इतर, २०१७).

१०. शिकण्याची प्रक्रिया आणि शिक्षणाचा दर्जा/गुणवत्ता - शाळांमधील एकूण नावनोंदणी वाढल्याचे जरी आम्हाला दिसून आले तरी हे विद्यार्थी शाळेत टिकून राहण्यासाठी आणि प्रत्यक्ष शिकण्यासाठी काही विशेष प्रयत्न केलेले दिसत नाहीत. एका बाजूला, शाळेत येणाऱ्या आणि टिकून राहणाऱ्या मुलांची संख्या वाढते आहे  तर दुसऱ्या बाजूला, शाळेत ते जे काही शिकत आहेत ते खूपच अपुरे आहे. (बॅनर्जी , आर., २०१५, वानखेडे, २००१).

११. शैक्षणिक कामाबद्दलचे भेदभाव आणि गैरसमज - काही काही सामान्य गैरसमज असे आहेत की वंचित समाजांमधून आलेले विद्यार्थी उच्च जातींमधील विद्यार्थ्यांच्या तुलनेत शाळेत उत्तम अभ्यास करून दाखवू शकत नाहीत, परंतु प्रत्यक्ष असे दिसून आले आहे की यांपैकी अनेक विद्यार्थी परीक्षांमध्ये उत्तम यश मिळवतात. (रामचंद्र व इतर, २००८). अभ्यासाच्या बाबतीत असे दिसून आले की जर एखाद्या मुलाला भेदभाव करून वागणूक दिली गेली तर त्याच्या आत्मसन्मानाच्या भावनेला धक्का बसतो. अनेकदा, असे दिसून आले की ज्या मुलांना शाळेत येण्यापूर्वी आणि शाळेनंतर काम करावे लागते त्यांचे शिक्षक विशेष कौतुक करीत नाहीत. जाती व समाजांवर आधारीत काही गैरसमजांमुळे किंवा गृहीत धरलेल्या गोष्टींमुळे दीर्घकालीन परिणाम होत असतो कारण मुलेही याकडे लक्ष देतात आणि आपल्याला शिक्षण घेता येणे अशक्यच आहे असे त्यांना वाटू लागते. (यशस्वीपणे प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्यावर परिणाम करणारे घटक - रामचंद्रन, २००४). शिवाय , इन्क्लुजिव्ह एज्युकेशन म्हणजेच सर्वांचा समावेश करून घेणारे शिक्षण हा मुद्दा विशेषत: आंध्र प्रदेश व आसाम या राज्यांसाठी महत्त्वाचा ठरलेला आहे आणि वर्गांमध्ये कोणती भाषा वापरली जाते, मध्यान्हभोजनाचे वेळी बसण्याची व्यवस्था कशी असते आणि पाणी उपलब्ध असते की नाही हेही मुद्दे महत्त्वाचे असतात. (रामचंद्रन व इतर, २००८). अशा प्रकारच्या पद्धती येथे अस्तित्वात आहेत का हे या अभ्यासात पाहिले गेले आहे.

१२. शिक्षकांच्या गुणवत्तेशी संबंधित मुद्दे - शिक्षकांचे पगार, गैरहजेरी, कामाच्या ठिकाणची स्थिती, जबाबदाऱ्या आणि शिक्षणपद्धतींशी संबंधित कौशल्ये यांचे मूल्यमापन होणे गरजेचे आहे, व त्याबरोबरच, जेथे या शिक्षकांचे काम चालते तेथील एकूण राजकीय आणि प्रशासकीय परिस्थितीचाही अभ्यास होणे गरजेचे आहे. सुरुवातीपासूनच, शिक्षणपद्धतीने शिक्षकांचा विचार हा विद्यार्थ्यांना माहिती पुरवणारे असा केलेला आहे. यामुळे शिक्षकांच्या मनोवृत्तीवर आणि त्यांना प्रेरणा मिळण्यावरही परिणाम होतो. (रामचंद्रन, २००८) . शिवाय, शैक्षणिक विकास दीर्घकाळपर्यंत टिकून राहण्यासाठी कौशल्य विकास, क्षमताबांधणी आणि शिक्षकांना प्रेरणा देणे या गोष्टींकडेही अधिक लक्ष देणे आवश्यक आहे. (सुजाता, के, २००२) . अशा रीतीने, या साहित्यात दिसून आल्यानुसार, शिक्षकांबाबत खूपच काम करण्याची नितांत गरज आहे असे आम्हाला वाटले.

१३. मध्यान्ह-भोजन (मिडडे मील्स) - भारतातील ग्रामीण भागांत, विशेषत: मुलींचे शिक्षण सुरू राहण्यासाठी, मध्यान्ह-भोजन ही योजना खूपच प्रभावी आहे. (ड्रेझ व किंग्डन २००१, टिळक १९९६). जर मुलाला शाळेत येण्यापूर्वी पुरेसे खायला मिळाले नाही, ज्याला छोटी भूक असे म्हटले जाते, तर त्यामुळे त्या मुलाच्या शाळेतील अभ्यासावर विपरीत परिणाम होतो, त्याला विषयाकडे लक्ष देण्यास आणि नवीन गोष्टी शिकण्यास त्रास होतो. अशा परिस्थितीत, दुपारी गरम मध्यान्ह-भोजन पुरवणे हे अधिकच आवश्यक ठरले आहे. (रामचंद्रन, २००८)

१४. घरातील वातावरण : मुलाच्या घरातील वातावरण कसे आहे याचा परिणाम ते मूल दीर्घकाळपर्यंत शिक्षण घेऊ शकेल का यावर होत असतो. (ड्रेझ व किंग्डन, १९९९). पालकांची शैक्षणिक पातळी किती आहे याचा आणि त्यांचे मूल शाळेत जाणार का या गोष्टीचा थेटपणे संबंध असतो. रेड्डी व इतर (२०१०) यांच्या अभ्यासानुसार, जर पालक सुशिक्षित असतील, तर मूल शाळेत जाण्याची शक्यता जास्त असते. परंतु, जर पालक अशिक्षित असतील, तर मूल शाळेत न जाण्याचा धोका जास्त असतो. शिवाय, शेजारी व समाजातील लोकही मुलाला शाळेत पाठवू नये यासाठी दबाव आणण्याची शक्यता असते, व अशिक्षित पालकांना या दबावापुढे हार मानावी लागते. मैत्रा व शर्मा (२००९) यांच्या अभ्यासातून असे दिसून आले, की जर आईचे शिक्षण झालेले असेल तर मुलगा व मुलगी या दोघांचेही प्राथमिक शिक्षण पूर्ण होण्याची शक्यता जास्त असते, आणि जर वडिलांचे शिक्षण पूर्ण झालेले असेल तर मुलग्यांचे शिक्षण माध्यमिक शिक्षणाच्याही पुढे चालू राहण्याची शक्यता जास्त असते. सेनगुप्ता व गुहा (२००२) यांच्याही अभ्यासातून असे दिसून आले की मुलींच्या शिक्षणाच्या बाबतीत, घरातील वातावरण, घरातील जबाबदाऱ्या यांचा आणि मुलींच्या शिक्षणाचा थेटपणे संबंध होता. पालकांना साक्षरतेचे, दैनंदिन अंकगणित करता येण्याचे आणि शाळेतील इतर ज्ञानाचे फायदे किती प्रमाणात जाणवतात हा घटक बालकाला शाळेत पाठवण्याच्या निर्णयावर परिणाम करत असतो. (ड्रेझ आणि किंग्डन, १९९९)